रायगड, सोमवार, दि. १ जुलै २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

Required Teacher
TUKARAM RAMA PATIL PUBLIC SCHOOL
At- valap village. Tal- panvel, Dist Raigad.
Standard 3rd and 4th. All subject
Qualification - H. S. C. Ded. With fluency in spoken English.
Prefered by location -Near by panvel New panvel, Taloja.
Contact- 8879498842




## देशभर विजयाचा जल्लोष

'भारत माता की जय, इंडिया... इंडिया'चा जयघोषाने शनिवारच्या रात्रीपासून संपूर्ण भारत देश भारावून गेला आहे. टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेच्या संघावर सात धावांनी दणदणीत विजय मिळवला. या दमदार विजयाने भारतीय संघाने दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषकावर आपलं दिमाखात नाव कोरलं. भारताने तब्बल १७ वर्षांनी टी-२० विश्वचषक जिंकल्यानं रोहितसेनेच्या या कामगिरीचं सध्या जगभरात भरभरुन कौतुक केलं जात आहे. एकदिवसीय विश्वचषक थोडक्यात हुकल्यानंतर टी-२० विश्वचषकासाठी भारतीयांच्या खूप अपेक्षा होत्या. या अपेक्षा पूर्ण करत भारतीय संघाने हा विश्वचषक आपल्या नावावर केला. यामुळे भारतीय क्रिकेटप्रेमींचा उत्साह गगनाला भिडला होता. गल्लीपासून दिल्लीपर्यंत सर्वच ठिकाणी भारताच्या विजयाचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यात लहानांपासून थोरांपर्यंत सर्व क्रिकेटप्रेमी सहभागी झाले होते. फटाके फोडून गाण्यांच्या तालावर ठेका धरत युवकांनी जय हो.. इंडियाचा जयघोष केला. अनेक ठिकाणी दुचाकी, चारचाकी वाहनांमधूनदेखील हातात तिरंगा घेऊन आनंद व्यक्त केला.

(अधिकचे वृत्त पान ८ वर)




### ई-पोर्टलवरील आकड्यांचा खेळ थांबवा

# नोंद नाही, पोट रिकामे

### आदिवासींना अन्नधान्याची सोय करा; सामाजिक संघटनांची मागणी

। आविष्कार देसाई ।
। रायगड ।

**जिल्ह्यामध्ये तब्बल ४० हजार ९०२ स्थलांतरीत मजूर आहेत. त्यांची ई-श्रम पोर्टलवर नोंदणी आहे, मात्र रेशनकार्ड नसल्याने त्यांना रेशनवरील धान्य उपलब्ध होत नाही. परंतु, जिल्ह्यात लाखोंच्या संख्येने आदिवासी आणि कातकरी समाजातील नागिरक आहेत. त्यांची ई-श्रम पोर्टलवर नोंद नसल्याने त्यांना उपाशी राहावे लागत आहे. सरकार आणि प्रशासनाने आकड्यांचा खेळ थांबवून त्यांच्यादेखील ताटात दोन वेळचे अन्न देणे गरजेचे असल्याची बाब जिल्ह्यातील सामाजिक संघटनांनी अधारेखित केली आहे.**



> ई-श्रम पोर्टलवरील रेशनकार्ड डेटावर नोंदणीकृत असलेल्या मात्र शिधापत्रिका नसलेल्या स्थलांतरीत कामगारांची संख्या ४० हजार ९०२ आहे. पोर्टलवर नोंदणीकृत स्थलांतरीत कामगारांना उत्पन्नानुसार शिधापत्रिका देण्याची कार्यवाही जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयांमध्ये सुरु आहे. ज्या व्यक्तींनी स्वतःचे नाव ई-श्रम पोर्टलवर नोंदणीकृत केलेले आहे, मात्र अद्याप कोणत्याही प्रकारच्या शिधापत्रिकेचा लाभ घेतलेला नाही, अशा व्यक्तींनी आवश्यक त्या कागदपत्रांसह जवळच्या तहसील कार्यालयामध्ये जाऊन शिधापत्रिकेचा लाभ घ्यावा. – सर्जेराव सोनवणे, जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड

> जिल्ह्यात लाखोंच्या संख्येने आदिवासी आणि कातकरी समाज आहे. त्यांची ई-श्रम पोर्टलवर अद्याप नोंद करण्यात आलेली नाही. हा समाज मोलमजुरीसाठी कायम स्थलांतरीत होत असतो. त्यांची योग्य पद्धतीने सरकार दरबारी नोंद होत नाही. याच कारणाने त्यांना रेशनच्या धान्यापासून वंचित राहावे लागते. सरकार आणि प्रशासनाने आकड्यांचा खेळ थांबवून त्यांच्या अन्नधान्याची सोय करणे गरजेचे आहे. तसेच संबंधितांना रेशनकार्ड देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. – उल्का महाजन, सामाजिक कार्यकर्त्या


जिल्ह्यासाठी ठराविक अन्न-धान्याचा कोटा मंजूर केलेला असतो. त्यामुळे अतिरिक्त धान्य देण्यात अडचण येत असल्याची हतबलता जिल्हा पुरवठा प्रशासनाकडून सातत्याने व्यक्त केली जाते. त्यामुळे मोठ्या संख्येने आदिवासी, कातकरी समाजातील नागरिकांना उपाशी राहावे लागते. यासाठी संबंधित यंत्रणेने जिल्ह्यासाठी आवश्यक असणाऱ्या कोट्यामध्ये अधिकची वाढ करावी आणि हा प्रश्न सोडवणे गरजेचे आहे. अन्यथा जिल्ह्यातील लाखोंच्या संख्येने आदिवासी समाजाला योजना असूनही त्याचा लाभ घेता येणार नाही. समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी विविध सामाजिक संघटना प्रयत्नशील आहेत.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत जिल्ह्यातील रेशन दुकानांमधून अंत्योदय व प्राधान्य कुटुंब लाभार्थींना धान्य वितरण करण्यात येते.

पान २ वर

## एकाच कुटुंबातील पाच जण भुशी धरणामध्ये बुडाले

। पुणे । प्रतिनिधी ।



लोणावळ्यात वर्षाविहारासाठी गेलेल्या एका कुटुंबातील पाच जण रविवारी भुशी धरणामध्ये बुडाले. यामध्ये चार लहान मुले आणि एका महिलेचा समावेश आहे. हे सर्वजण पुण्यातील रहिवासी आहेत. भुशी धरणाच्या पाठीमागे असलेल्या डोंगरातील वॉटर फॉल, जो रेल्वेचा वॉटर फॉल म्हणून ओळखला जातो, तिथे हे अन्सारी कुटुंब वर्षाविहाराचा आनंद लुटत होते. पाय घसरुन हे सर्वजण वाहून गेल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

धबधब्याचे पाणी भुशी धरणात येते. त्यामुळे तिथे पाच जणांच्या शोधकार्य सुरु आहे. शिवदुर्ग मित्र आणि शहर पोलिसांच्या मदतीने शोधमोहीम राबवली जात आहे. स्थानिक प्रशासन आणि आपत्कालीन सेवांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेतली आहे. शोधमोहिमेत प्रगत उपकरणे आणि तंत्रज्ञानाचा वापर केला जात असून, या पाच जणांच्या शोधासाठी संपूर्ण प्रयत्न सुरू आहेत. स्थानिकांनी आणि पर्यटकांनी ही दुर्घटना पाहिली. त्यांच्या माहितीनुसार, कुटुंबातील सदस्यांनी एकमेकांना वाचवण्याचा प्रयत्न केला, पण पाण्याच्या वेगामुळे तो निष्फळ ठरला. या घटनेमुळे स्थानिकांसह पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

पान २ वर

## मुख्य सचिवपदी सुजाता सौनिक

**मुंबई :** राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव म्हणून सुजाता सौनिक यांनी पदभार स्वीकारला. सुजाता सौनिक या १९८७ बॅचच्या आयएएस अधिकारी आहेत. त्यांनी मावळते मुख्य सचिव नितीन करीर यांच्याकडे पदाचा कारभार हाती घेतला. सुजाता सौनिक याचे पती मनोज सौनिक यांनीदेखील राज्याचे मुख्य सचिव म्हणून काम पाहिले आहे.



सुजाता सौनिक यांनी या आधी राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदाचा कार्यभार सांभाळला आहे. त्यानंतर आता त्यांना मुख्य सचिवपदाची संधी मिळाली आहे. सुजाता सौनिक यांना मुख्य सचिवपदाचा एक वर्षांचा कार्यकाळ लाभणार असून, जून २०२५ मध्ये त्या निवृत्त होणार आहेत.

## पुढील चार दिवस मुसळधार

### हवामान विभागाचा अंदाज

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यात पुढचे चार दिवस मघेगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. यावेळी ३० ते ४० किलोमीटर प्रतितास वेगाने सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकणासह मध्य महाराष्ट्र आणि विदर्भामध्ये अलर्ट जारी केला आहे. पावसाचा वाढता जोर लक्षात घेता नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन हवामान खाते आणि प्रशासनाकडून करण्यात येत आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण महाराष्ट्र ते केरळ किनारपट्टीवर कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. त्यामुळे कोकण आणि मध्य महाराष्ट्रात येत्या ३० जून ते ३ जुलैपर्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. विदर्भामध्ये मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. पुढचे चार दिवस ठाणे, सिंधुदुर्ग, सातारा आणि



नाशिकमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या ठिकाणी हवामान खात्याने येलो अलर्ट जारी केला आहे. पुण्यासह सातारा, कोल्हापूरमध्ये हलका ते मुसळधार स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गमध्ये देखील जोरदार पावसाची शक्यता असून, याठिकाणी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुसळधार पावसामुळे नागरिकांनी घराबाहेर पडताना काळजी घ्यावी, असे आवाहन केले जात आहे.

## सुरईला दरडीचा वाढता धोका

### तहसीलदारांसह जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाची बघ्याची भूमिका

। अलिबाग । प्रमोद जाधव ।

आपत्ती रोखण्याचा गाजावाजा करणारे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आणि मुरुडचे तहसीलदार निद्रावस्थेत असल्याचे समोर आले आहे. पावसात मुरुड तालुक्यातील सुरई येथील दत्त टेकडी येथे शनिवारी पहाटेच्या सुमारास दरड कोसळली. सुदैवाने जीवितहानी टळली. मात्र, या घटनेबाबत महसूल व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग अनभिज्ञ असल्याचे



• (छायाचित्र : समीर मालोदे)

> दत्त टेकडीवरील लहान-मोठ्या दगडांचा धोका निर्माण झाला आहे. माती पावसामुळे भुसभुशीत झाली आहे. त्यामुळे शनिवारी माती, दगड खाली कोसळले. पहिल्याच पावसात ही परिस्थिती आहे, तर नंतर काय होणार, याची भीती आहे. त्यामुळे टेकडीवर असलेल्या माती दगडाचा धोका वाढला आहे. घटना घडूनदेखील प्रशासनाकडून उपाययोजनांसाठी कोणतीही हालचाल दिसून आली नाही. – सुरई महिला मंडळ

> सुरई येथील दत्त टेकडीवर केलेल्या माती दगडाच्या भरावाची पाहणी मंडळ अधिकारी यांनी केली आहे. ते दगड धोकादायक असल्याचे अहवाल आढळून आले आहे. दगड काढण्याच्या सूचना दिल्या आहेत. दोन दिवसात पुढील कार्यवाही केली जाईल. शनिवारी टेकडीवरील दगड माती कोसळली आहे. त्याचा फोटो प्राप्त झाला आहे. सुरक्षेच्या दृष्टीने कार्यवाही केली जाईल. – रोहन शिंदे, तहसीलदार मुरुड


उघड झाले आहे. याच टेकडीवरील उताराच्या भागात धनदांडग्यांनी दगड मातीचा भराव केला असून, त्याचाही धोका असताना प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेऊन नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये दरड कोसळ्याच्या घटना वारंवर घडत आहेत. दरडीखाली चिरडून आतापर्यंत सुमारे ४०० हून

पान २ वर

## लष्करप्रमुखपदी उपेंद्र द्विवेदी

**नवी दिल्ली :** देशाचे लष्करप्रमुख म्हणून जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी रविवारी मावळते लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांच्याकडून कार्यभार स्वीकारला. लष्करप्रमुखपदाचा कार्यभार हाती घेण्यापूर्वी जनरल द्विवेदी हे लष्कराच्या उपप्रमुख पदावर कार्यरत होते. २०२२ पासून त्यांच्याकडे लष्कराच्या



उत्तर विभागाची (नॉर्दर्न कमांड) जबाबदारी होती. जनरल द्विवेदी हे देशाचे ३० वे लष्कर प्रमुख ठरले आहेत. १९८४ मध्ये जम्मू-काश्मीर रायफल्समध्ये सर्वप्रथम द्विवेदी यांची नियुक्ती झाली होती. नॉर्दर्न कमांडमध्ये कमांडर म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केले आहे. चाळीस वर्षांच्या कार्यकाळात द्विवेदी यांनी विविध विभागात काम केले आहे.

### कमळ चिन्हावर लढण्याची संधी द्या!

# महायुतीतून अजित पवार साईड ट्रॅक?

### शेलारांना कार्यकर्त्यांनी सोडले भांबावून

। रायगड । खास प्रतिनिधी ।

४८ लोकसभा निवडणुकीतील पराभवाची कारणमीमासा भाजपाकडून करण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक शनिवारी अलिबाग येथे पार पडली. भाजपा नेते आशिष शेलार यांनी कार्यकर्त्यांचा कानोसा घेतला. अजित पवार गटाला आपल्यासोबत घेऊन फार मोठी चूक केली आहे. त्यामुळे विधानसभेच्या आगामी निवडणुकीत त्यांना सोबत घेऊ नका. कमळ चिन्हावर लढण्याची संधी आम्हाला द्या, अशी मागणी करत त्यांनी शेलारांना चांगलेच भांबावून सोडल्याचे विश्वसनीय



सूत्रांनी सांगितले. त्यामुळे महायुतीतून अजित पवार गटाला साईट ट्रॅक करण्याच्या हालचाली नजीकच्या कालावधीत वाढल्यास आश्चर्य वाटायला नको.

राज्यातील पक्ष फोडाफोडीचे राजकारण भाजपाने केले होते हे आता लपून राहिलेले नाही. राज्यातील जनतेला हे फारसे आवडले नसल्याने भाजपाला मतदारांनी जागा दाखवली आहे. सर्वाधिक जागा लढूनही भाजपाला फक्त ९ जागांवरच विजय मिळवता आला आहे, तर महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिंदे गटाला सात आणि अजित पवार गटाला फक्त एका जागेवर समाधान मानावे लागले आहे. फोडाफोडीच्या राजकारणात भाजपाचे हात चांगलेच पोळून निघाले आहेत. त्यामुळे आता भाजपा सावध पवित्रा घेत असल्याचे दिसत आहे.

शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस फोडल्याने मतदारांची सहानुभूती थेट उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना मिळाली, भाजपा आता हे जाणून आहे. ४८ लोकसभा मतदारसंघांतील राजकीय परिस्थिती काय आहे, स्थानिक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची विधानसभेच्या निवडणुकीबाबत भूमिका काय आहे. हे जाणून घेण्यासाठी आशिष शेलार शनिवारी अलिबाग-चोंढी येथील हॉटेल साईन येथे आले होते.या बैठकीत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी रोखठोक भूमिका घेतली. महायुतीमध्ये

पान २ वर

> **बैठकीमध्ये खदखद**
>
> भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविषयी तीव्र नाराजी आहे. नुकत्याच अलिबागमधील पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या बैठकीत कार्यकर्त्यांनी अजित पवार यांच्याबाबत खदखद बोलून दाखवली. अजित पवार महायुतीत नकोत, अशी भूमिका त्यांनी मांडली.

## फणसाड धरण ओव्हर फ्लो

### वर्षापर्यटनासाठी पर्यटकांची गर्दी

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

पावसाळा सुरू झाला की, पर्यटकांची पावले आपोआप रायगडातील धरण, धबधबे, हिलस्टेशनकडे वळतात. दरवर्षी हजारो पर्यटक पावसाळ्यात या ठिकाणांना भेट देत असतात. मुरुड येथील फणसाड धरण पर्यटकांचे खास आकर्षण ठरत आहे. मागील काही दिवसांपासून धरण परिसरात जोरदार पाऊस पडत असल्याने फणसाड धरण जोरदार वाहू लागले आहे. पर्यटकांसाठी ही आनंदात बातमी असून, मोठ्या संख्येने वर्षापर्यटनासाठी पर्यटक गर्दी करु लागले आहेत.



मुंबईपासून १५४ कि.मी. अंतरावर पनवेल-पेण-अलिबाग मार्गावर ५२ चौरस कि.मी. क्षेत्रावर विस्तारलेल्या फणसाड अभयारण्याला जणू निसर्गाचा वरदहस्तच लाभलेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात फणसाड अभयारण्याचे क्षेत्र मुरुड जंजिरा संस्थानाचे सर्वेसर्वा नवाब सिद्दी यांचे राखीव शिकार क्षेत्र होते. येथील जैवविविधतेचे संरक्षण व्हावे या हेतूने महाराष्ट्र शासनाने दि. २५ फेब्रुवारी १९८६ मध्ये फणसाड वन्यजीव अभयारण्य घोषित केले. भारतातून हजारो पर्यटक फणसाडला भेट देतात आणि खासकरून पावसाळी अतिशय सुंदर वातावरण असते. घनदाट

पान २ वर

# वारे, पोशीर ग्रामपंचायतीची कुऱ्हाडबंदी

## ■ कर्जत प्रेस असोसिएशनचे आवाहनानंतर ठराव

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणात जंगलतोड सुरू आहे, त्यामुळे हवामानबदलावर परिणाम दिसून येत आहे. त्यासाठी कर्जत प्रेस असोसिएशनकडून कर्जत तालुक्यात जनजागृती चळवळ हाती घेण्यात आली आहे. जंगलतोड होऊ नये यासाठी ग्रामपंचायत स्तरावर कुऱ्हाडबंदीसाठी प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, या प्रयत्नाचा भाग म्हणून कर्जत प्रेस असोसिएशन यांच्या आवाहनानंतर तालुक्यातील वारे आणि पोशीर ग्रामपंचायत यांनी असे ठराव घेऊन या चळवळीला आणि जनजागृती मोहिमेला बळ दिले आहे.

कर्जत तालुका निसर्गसंपन्न तालुका म्हणून ओळखला जात आहे. ग्रामीण भागातील वनसंपदा ही तालुक्याची ओळख आहे. मात्र, आता या भागातील जंगल संपत्ती मोठ्या प्रमाणात नष्ट होत असल्याचे दिसून येत आहे. जंगलतोड करणारे ठेकेदार दिवसेंदिवस झाडांची कत्तल करत आहेत. याबाबतीत वन प्रशासनाचे काही बाबतीत दुर्लक्ष होत आहे. झाडे तोडण्याची परवानगी याच विभागाकडून दिली जात आहे. मात्र, या परवानगीच्या अटी- शर्तींचे पालन होत नसल्याने गैरवापर मोठ्या प्रमाणात वाढले आहे. परिणामी, दिवसागणिक जगल भुईसपाट होत आहे या साठी आता सर्व ग्रामस्थांनी जागरूक होण्याची गरज आहे. वनविभाग नियमाप्रमाणे परवानगी देत असताना काही ठिकाणी अनधिकृतपणे बेसुमार झाडांची कत्तल उघड्या डोळ्यांनी पाहावी लागत आहे. त्याचा परिणाम निसर्गावर होत असून उन्हाळ्यात प्रचंड तापमान वाढ होत आहे.दिवसागणिक यात वाढ होणार हे निश्चित आहे.

यासाठी तालुक्यातील प्रत्येक ग्रामपचायतीने पुढाकार घेऊन आपल्या वारे ग्रामपंचायत हद्दीत कायम कुऱ्हाडबंदी करून वनसंपतीचा ऱ्हास होऊ नये याकरिता सर्वानुमते ग्रामसभेत ठराव घेऊन सर्व प्रकारच्या खासगी जमिनीवरील वृक्षतोड किमान कायम कुऱ्हाडबंदी करावी, असा ठराव ग्रामसभेत प्रस्तावित करून तो शासनाच्या संबंधित विभागास पाठवावे जेणेकरून तापमानवाढीच्या समस्या काही प्रमाणात कमी होईल यासाठी कर्जत प्रेस असोसिएशनकडून जनजागृती केली जात आहे. यावर्षी तापमान ४० डिग्रीपेक्षा जास्त गेला आहे, अशीच स्थिती राहिली तर पुढच्या पिढीच दूर राहिलं आजच्या पिढीलाही बाहेर फिरणे मुश्कील होईल. एक दिवस असा येईल की प्रचंड वाढलेल्या तापमानाने रस्त्यावर माणसं करपून जळतील.यासाठी कर्जत तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत यांनी असे ठराव आपल्या ग्रामसभेत घ्यावेत, असे आवाहन कर्जत प्रेस असोसिएशनने केले आहे.

कर्जत तालुक्यातील वारे ग्रामपंचायत मध्ये पत्रकार दीपक बोराडे यांनी जंगलाचे महत्त्व विशद करून ग्रामसभेत ठराव मांडला, त्या ठरावाला शरद तवले यांनी अनुमोदन दिले.त्या ठरावाला सर्वांनी सहमती दर्शवून ठराव मंजूर केला आहे. तर पोशीर ग्रामपंचायतीकडूनदेखील असा ठरव ग्रामस्थांनी ग्रामसभेत आणला. सरपंच आरती राणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत पांडुरंग राणे यांनी ठराव मांडला आणि ग्रामपंचायत सदस्य अनिल जोशी यांनी अनुमोदन देत ठराव मंजूर केला आहे. तालुक्यात सर्व ग्रामपंचायतीकडून पुढील १५ वर्षे कुऱ्हाड बंदी ठराव घेण्यावर कर्जत प्रेस असोसिएशनकडून प्रयत्न सुरू आहेत.

# हेटवणे धरणातून दूषित पाणीपुरवठा



। हमरापूर । वार्ताहर ।

पेण तालुक्यातील हमरापूर, तरणखोप व जिते विभागातील गावांना हेटवणे धरणाच्या मुख्य जलवाहिनीतून मातीमिश्रित गढूळ, दुर्गंधीयुक्त दूषित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून याबाबत संबंधितांनी तत्काळ लक्ष देऊन उपाययोजना करावी अशी मागणी डावरे येथील माजी आरोग्य निरीक्षक हरिभाऊ घरत यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी अलिबाग व पाणीपुरवठा विभाग कार्यालय यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पेणच्या हेटवणे धरणातून होणारा पाणीपुरवठा जलवाहिनीतून संबंधित गावांना होत आहे, मात्र गेल्या काही दिवसांपासून गढूळ, दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने पोटदुखी, उलटी, मळमळ अशा आजाराने नागरिक त्रस्त आहेत.

हेटवणे धरणात पाणीसाठा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे, तरीही गढूळ पाणी येत असल्याने नागरिक पिण्यासाठी विकत किंवा अन्य ठिकाणांहून पाणी आणावे लागते. आता पावसाळा सुरु झाला आहे, त्यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पाणीपुरवठा विभाग अधिकाऱ्यांनी याप्रकरणी तातडीने लक्ष घालून जनतेला शुद्ध पाणीपुरवठा करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# पावसामुळे शेतातील राब झाले हिरवेगार

## ■ एक आठवड्यात भातलागवड
## ■ शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त

। पाताळगंगा । वार्ताहर ।

गेले अनेक दिवस पाऊस पडत असल्याने शेतातील राब तयार होत उत्तम होत आहेत. मागील वर्षी पावसाने लपंडाव खेळत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले होते. मात्र, यावर्षी वरुणराजानं शेतकरी बांधावांवर कृपादृष्टी केली आहे. यामुळे दुबार पेरणीचं संकट टळले आहे. सध्या शेतीच्या कामाला वेग आला आहे. यामुळेच बैलजोडीच्या सहाय्याने शेतात उखळणी सुरु झाली आहे.

दरवर्षी पाऊस नियोजित वेळेवर पडेल याची आता शाश्वती राहली नाही. मात्र, शेतात राब पेरणी केल्यानंतर पाऊस मौन रुप धारण केल्यामुळे



शेतातील राब करपून जात असतात. मात्र, यावर्षी पाऊस राबांसाठी उपयुक्त पडत असल्याने सध्या शेतातील भातरोपे चांगली हिरवीगार झाली असून, आठवडाभरात लावणीयोग्य होतील, अशी माहिती शेतकऱ्यांनी दिली.

# कोयना प्रकल्पग्रस्तांचे एकदिवसीय आंदोलन

। पनवेल । वार्ताहर ।

कोयना प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने शुक्रवार, दि.२८ जून रोजी कोयना वसाहत असलेल्या प्रत्येक तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. त्याचप्रकारे पनवेल येथेसुद्धा तहसील कार्यालयासमोर अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघातर्फे एकदिवसीय लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.

कोयना जलविद्युत प्रकल्पासाठी सन १९६० साली एकूण १०५ गावांचे पुर्नवसन करण्यात आले. त्यावेळी पुर्नवसन कायदा अस्तित्वात नसल्याने प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी, नागरी सुविधा इत्यादी बाबींपासून वंचित राहावे लागेल. तत्कालीन मंत्री महोदयांच्या आश्वासनांवर कोणतीही तक्रार न करता ज्या-ज्या ठिकाणी जागा उपलब्ध झाली, त्या ठिकाणी स्थलांतरित झालेल्या वसाहती अद्याप सुविधांपासून वंचित राहिलेल्या आहेत. त्यातील रायगड जिल्ह्यात ४७ वसाहती, ठाणे जिल्ह्यात १४ वसाहती, पालघर जिल्ह्यात ८ वसाहती, रत्नागिरी जिल्ह्यात ४ वसाहती, सातारा जिल्ह्यातील पाटण व जावळी तालुक्यात सरकून राहिलेल्या एकूण ६७ वसाहती आहेत. या वसाहतींचा प्रश्न अद्याप मार्गी लागला नाही आहे.

यासंदर्भात वारंवार मुख्यमंत्री, पुनर्वसन मंत्री व इतर शासकीय अधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देऊनसुद्धा कोणतीही कारवाई होत नसल्याने सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात आंदोलन छेडण्यात येणार असल्याची माहिती संघाचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, कार्याध्यक्ष अर्जुन कदम व सरचिटणीस लक्ष्मण जाधव यांनी दिली आहे. याबाबतचे निवेदन पनवेल तहसीलदार विजय पाटील यांना आज देण्यात आले.

# युनायटेड वेकडून नागेवाडीमध्ये कृती दिन साजरा

## ■ जलसंजीवनी प्रकल्पांतर्गत विविध उपक्रम

। नेरळ । प्रतिनिधी ।

आदिवासी आणि ग्रामीण भागात जलसंजीवनी अभियानचे माध्यमातून तेथील लोकांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी युनायटेड वे ही संस्था कार्यरत आहे. युनायटेड वे मुंबई संस्थेद्वारे कार्यान्वयित जल संजीवनी प्रकल्प, कर्जत अंतर्गत पाथरज ग्रामपंचायतीमधील नागेवाडी येथे येथील सर्व उपक्रमांचा 'कृती दिन' साजरा करण्यात आला.

यावेळी नागेवाडी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळामधील विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली. शिक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक विषयांचे फलक हातात धरून विविध घोषणा दिल्या. विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धन, सेंद्रिय खत जीवामृतचा वापर, पाणी अडवणे, स्वच्छता, शौचालयाचा वापर यांसारख्या आवाहन करण्यात येत होते. प्रभात फेरीनंतर दशरथ विष्णू आगिवले यांच्या शेतात सर्वांच्या हस्ते ५० झाडे लावण्यात आली. झाडांना कीड आणि वाळवी लागू नये म्हणून



कीडनाशक क्लोरोपायरीफॉस आणि बुरशीचे रोग होऊ नये म्हणून शेतकऱ्यांची मित्र बुरशी असलेली ट्रायकोडर्माचा आवर्जून वापर यावेळी करण्यात आला. तर, लागवड करण्यात आलेल्या झाडांची वाढ व्हावी म्हणून बचत गटाच्या महिलांनी तयार केलेले गांडूळखत वापरण्यात आले.

सदर उपक्रमास नागेवाडी येथील ४० विद्यार्थी तसेच शिक्षक, स्थानिक तरुण, ग्रामस्थ महिला, शेतकरी आणि जलसंजीवनी प्रकल्पामधील कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

# आरोग्य सहाय्यिका तनुजा मुळे सेवानिवृत्त

। तळा । वार्ताहर ।

तळा प्राथमिक आरोग्य केंद्र तळाच्यावतीने आरोग्य सहाय्यिका तनुजा पु. मुळे यांचा नियतकालानुसार सेवानिवृत्ती समारंभ प्रा. शाळा सभागृहात २८ जून रोजी आयोजित केला होता. याप्रसंगी व्यासपीठावर तालुका आरोग्य अधिकारी वंदन पाटील, वैद्यकीय अधिकारी रजेंद्र मोघे, डॉ. होम सांगाडे, नगराध्यक्षा माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, डॉ. चंद्रकांत विचारे, सत्कारमूर्ती तनुजा मुळे, भद्रेश पटेल, श्रीराम



कजबजे, महेद्र कजबजे, महादेव गोळे, पूजा मुळे (पतंगे), श्री. नांदगावकर उपस्थित होते.

यावेळी आरोग्य विभागाकडून शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन तनुजा मुळे यांना सन्मानित करण्यात आले. त्यांनी आरोग्य सेविका ते आरोग्य सहाय्यिका अशी ३९ वर्षे सेवा केली. आरोग्य सेवा हीच ईश्वर सेवाचा वसा घेऊन तळा येथे जवळपास २८ वर्षे सेवा केली. बाकी सेवा माणगाव, मुरूड तालुक्यात झाली. दरम्यान, तनुजा मुळे सत्काराला उत्तर देताना सर्वांचे आभार मानले.

पान १ वरून

## नोंद नाही, पोट रिकामे

योजनेत एकूण १७ लाख ६९ हजार ७७६ लाभार्थी आहेत. या लाभार्थींचे आधार प्रमाणीकरण आणि मोबाईल सिडींग करण्याच्या शासन सूचना आहेत. रेशन कार्डसोबत आधार जोडणी करताना लाभ घेणारी व्यक्ती तीच आहे किंवा कसे याची पडताळणी होणार आहे. याकरिता शिधापत्रिकेतील अर्थात कुटुंबातील सर्व लाभार्थ्यांनी आपल्या जवळच्या रास्तभाव धान्य दुकानांमध्ये प्रत्यक्ष जाऊन अंगठ्याचा ठसा देऊन तसेच कुटुंबातील व्यक्तींचे मोबाईल क्रमांक देऊन आधार प्रमाणिकरण करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे ज्या शिधापत्रिकाधारकांनी अद्याप आपले आधारकार्ड शिधापत्रिकेस जोडलेले नाही, अशा शिधापत्रिकाधारकांनीही आपले आधारकार्ड शिधापत्रिकेस संलग्न करावयाचे आहे. यामुळे रेशनिंगची गळती थांबण्यासह बोगस लाभार्थींना चाप बसणार आहे.

**सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये केंद्र शासनाच्या ई-श्रम पोर्टलवरील नोंदणीकृत स्थलांतरीत, जे अद्याप रेशनकार्ड डेटावर नोंदणीकृत नाहीत, अशा स्थलांतरीतांना प्रचलित निकषानुसार विशेष मोहिमेंतर्गत तातडीने शिधापत्रिका वितरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या ई-श्रम पोर्टलवरील नोंदणीकृत स्थलांतरीत, जे अद्याप रेशनकार्ड डेटावर नोंदणीकृत नाहीत, अशा स्थलांतरीतांना शिधापत्रिका वितरीत करण्याबाबतच्या शासनाच्या सूचना आहेत.**

## सुरईला दरडीचा वाढता धोका

अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्हा कार्यालयात स्वतंत्र यंत्रणा गेल्या अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे. पावसाळ्यापूर्वी अनेकवेळा बैठका घेऊन उपाययोजना करण्याचा कागदी घोडा नाचवण्याचे काम या विभागाकडून केल्याचे समोर आले आहे. प्रशिक्षण बैठकांवर वेळ घालवून नागरी सुरक्षेचा दिखावा ही यंत्रणा करीत असल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे. आपत्ती रोखण्यासाठी गावातील मंडळींसह वेगवेगळ्या यंत्रणेची मदत घेणार असल्याचे सांगण्यात आले आहे. परंतु, ज्या गावात दरड कोसळते, त्या दुर्घटनेची चोवीस तास होऊनदेखील आपत्ती विभागाला माहिती नसणे, ही मोठी शोकांतिका असल्याचे बोलले जात आहे.

निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या सुरई येथील डोंगरावर धनदांडग्यांनी जागा घेऊन बांधकाम केले आहे. त्यांनी दगड मातीचा भराव डोंगराच्या टोकावर टाकला आहे. पावसाळ्यात दगड, माती खाली येऊन जीवितहानी होण्याची भीती आहे. डोंगराच्या टोकापासून शंभर फूट खाली आदिवासीवाड्यांसह गावे आहेत. या ठिकाणी अडीचशेहून अधिक घरे असून, एक हजारहून नागरिक राहात आहेत. त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विकासाच्या नावाखाली धनदांडग्यांकडून केलेल्या या भरावाबाबत अनेक वेळा स्थानिकांनी तहसीलदार आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या निदर्शनास आणून दिले. मात्र, प्रत्यक्षात ठोस कार्यवाही करण्यास ही यंत्रणा उदासीन ठरत असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात ऑरेंज अलर्टचा इशारा दिला आहे.

गेल्या चार दिवसांपासून पाऊस कोसळत आहे. या पावसात सुरई येथील दत्त टेकडीवरील दरड शनिवारी पहाटेच्या सुमारास कोसळली. सुदैवाने दगड माती घरांवर कोसळली नाही. प्रशासन सर्वसामान्यांच्या जिवाशी खेळत आहे. फक्त बघ्यांची भूमिका घेतली जात असल्याचा आरोप केला जात आहे. दरड कोसळण्याच्या या घटनेनंतर खालापूर येथील इरसाल वाडीची पुनरावृत्ती होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. दरड कोसळून २४ तास झाले असताना या घटनेबाबत प्रशासन अनभिज्ञ असल्याची संतापजनक प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. दुर्घटना घडल्यावर प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. येथील ग्रामस्थ जीव मुठीत धरून राहात आहेत.

## फणसाड धरण ओव्हर फ्लो

झाडी असल्याने पावसाचे प्रमाण खूप आहे आणि उंचावर असल्याने पावसात धुक्यासारखे वातावरण असते. शेकडो पाणवठे पावसाच्या पाण्याने भरून जातात, प्राणी जलक्रीडा करण्यासाठी पाणवठ्यावर येतात. फणसाड धरण फुल्ल भरून त्याच्या वाहून जाणाऱ्या पाण्याचा आनंद घेण्यासाठी हजारो पर्यटक बोर्लीमांडलामार्गे भोईघर गावात येतात. गावातून धरण १० मिनिटांवर असल्याने गावाला पर्यटन व्यवसाय मिळतो. फणसाड धरणावर हिरव्यागार भातशेतातून जाण्याचा आनंद काही वेगळाच असतो.

जंगलात सुमारे ७१८ प्रकारचे वृक्ष, १७ प्रकारचे सस्तन प्राणी, १६४ प्रकारचे रंगीबेरंगी पक्षी, २७ प्रकारचे साप व अनेक वन्य श्वापदे आढळतात. फणसाड अभयारण्यात साग व निलगिरीची रोपवने यासह प्रामुख्याने ऐन, किंजळ, जांभुळ, द्वेद, कुडा, गेळा, अंजनी, कांचन, सावर, अर्जुन हे वृक्ष व कर्करोगावर गुणकारक नरक्या याबरोबरच सीताअशोक, सर्पगंधा, कुरडु, रानतुळस, कढीपत्ता, उक्षी या औषधी वनस्पती मोठ्या प्रमाणात आढळून येतात. वाकेरी, वाघाटी, पळसवेल, पेंटगुळ इत्यादी प्रकारच्या वेली व जगातील सर्वात लांब वेलींपैकी एक असलेली गारंबी आढळून येते. फणसाड वन्यजीव अभयारण्यात १७ प्रकारचे वन्यप्राणी आहेत. यामध्ये रानससा, सांबर, भेकर, पिसोरी, साळींदर, तरस, रानडुक्कर, मुंगूस, कोल्हा, वानर, माकड, रानमांजर व बिबट्या आणि पर्यटकांच्या व अभ्यासकांचे आकर्षण असलेले शेकरू येथे हमखास दृष्टीस पडते. अभयारण्यात भटकंतीसाठी विशेष वाटा (ट्रेल) तयार केल्या आहेत. त्यात फणसाडगाण, धरणाधीमान, चिखलगाण, सावर तलाव सुपेगाव देवराई याचा समावेश आहे. गाण म्हणजे पाण्याची जागा. फणसाड वन्यजीव अभयारण्यात तब्बल २७ पाणस्थळे आहेत. यातील चिखलगाया पाणस्थळावर अनेक पक्षी, प्राणी येतात. त्यांचे जवळून निरीक्षण करता यावे, याकरिता येथे खास एक लक्षगृह बांधण्यात आले आहे, तसेच पुण्याचा माळ, चाकाचा माळ, दांडा, गाडग्याचा माळ या ठिकाणी निरीक्षणासाठी उंच मनोरे उभारण्यात आले आहेत. यातून दिसणारे दृश्य मन मोहून टाकते. स्थानिकरित्या आढळणारे जांभा दगडातील नवाबाने खास शिकारीसाठी बांधले आडोसे जागोजागी आजही पहावयास मिळतात. येथील पर्यटकांच्या सुविधेसाठी आखण्यात आलेल्या आहेत. ठराविक प्राणी-पक्षी या ठिकाणी हमखास दर्शन देतात. पर्यटकांना वनभोजनाचा आनंद गावातील महिला बचत गट स्वस्त व चविष्ट भोजन देतात, तर या यंदाच्या पावसात फणसाड अभयारण्य भेट द्या.

## महायुतीतून अजित पवार साईड ट्रॅक?

अजित पवार गटाला घेऊन आपण चूक केली आहे. त्यांच्यामुळेच आपल्याला राज्यात अपेक्षित यश मिळाले नाही, असे अलिबाग आणि श्रीवर्धनमधील पदाधिकाऱ्यांनी शेलार यांना सांगितले. विधानसभेच्या निवडणुका जिंकायच्या असतील, तर अजित पवारांना सोबत नको, अशी मागणी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी केल्याचे सूत्रांनी सांगितले. आपण आजून किती दिवस इतरांना निवडून आणण्यासाठी काम करायचे. आम्हाला कमळ चिन्हावर लढण्याची संधी द्या, अशी मागणी केल्याकडे सूत्रांनी लक्ष वेधले. कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे दिसताच शेलार यांना काहीकाळ सुचेनासे झाले. त्यांनी थेटपणे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना याबाबत शब्द दिला नाही. शेलार यांनी हा विषय गुंडाळल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

दरम्यान, याप्रश्नी भाजपाच्या वरिष्ठांनी निर्णय न घेतल्यास आगामी विधानसभेच्या निवडणुकीत फटका बसण्याची शक्यता नाकारता येणार नाही. दरम्यान, अलिबागमध्ये भाजपाच्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांची बैठक पार पडली. भाजपा नेते आशिष शेलार यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. आगामी विधानसभेच्या निवडणुकांबाबत राज्य पातळीवरुन जो निर्णय होईल, तोच जिल्ह्यासाठी लागू असेल. त्यामुळे स्वतंत्र लढण्याचे अथवा अजित पवार यांना महायुतीतून बाजूला करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली नाही, असे भाजपा जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी कृषीवलशी बोलताना सांगितले.

## एकाच कुटुंबातील पाच जण भुशी डॅममध्ये बुडाले

या दुर्देवी घटनेनंतर, अन्सारी कुटुंबातील इतर सदस्य आणि नातेवाईक दुःखात बुडाले आहेत. प्रशासनाने त्यांना आवश्यक त्या मदतीचे आश्वासन दिले आहे. शोधकार्य लवकरात लवकर यशस्वी होईल, अशी अपेक्षा आहे. लोणावळ्यातील भुशी डॅमजवळील धबधब्यात एक महिला आणि चार मुलं बुडाली आहेत. २ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. शोध आणि बचावकार्य सुरू आहे. पाचही जण एकाच कुटुंबातील असून, ते पुण्यातील सय्यद नगर परिसरातील असल्याची माहिती पुण्याचे एसपी पंकज देशमुख यांनी दिली.

# पुनर्वसित नवीन शेवा ग्रामस्थ न्यायाच्या प्रतीक्षेत

## ■ १ जुलैपासून होणार जागेची मोजणी
## ■ साखळी उपोषण तात्पुरते स्थगित

। रसायनी । वार्ताहर ।

पुनर्वसित नवीन शेवा गावाचे पुनर्वसन १९८७ साली बोकडविरा येथील सर्व्हे नं. ११२ मध्ये एकूण क्षेत्रफळ ३३.६४ हेक्टर जमिनीमध्ये झालेले असताना सिडकोकडून फक्त १० हेक्टरमध्ये नवीन शेवा गावाचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. तसेच उर्वरित जागा सिडकोच्या ताब्यात असून, ती जागा ग्रामस्थांना मिळावी म्हणून अनेकवेळा मोर्चा, आंदोलन, उपोषण केलेली आहेत. परंतु, कित्येकवेळा ग्रामस्थांना आश्वासनाची खैरात देऊन पुनर्वसित नवीन शेवा ग्रामस्थांची फसवणूक केलेली आहे.

नवीन शेवा ग्रामपंचायतीने अनेक वेळा जेएनपीटी, सिडको, जिल्हाधिकारी रायगड व तहसीलदार उरण यांच्याकडे वारंवार पत्रव्यवहार करूनसुध्दा आजपर्यंत आम्हाला



जागेचा ताबा मिळालेला नाही, माजी आमदार मनोहर भोईर यांनी विधानभवनामध्ये विनंती अर्ज समिती समोर हा विषय घेतला होता. त्याहीवेळेस जमिनीचा ताबा देण्यात यावा, अशी विनंती अर्ज समितीच्या अध्यक्षांनी आदेश पारित केले होते. तरीसुध्दा सिडकोने त्या आदेशाचे पालन न करता केराची टोपली दाखविली. सदर विषय मार्गी लागावा म्हणून नवीन शेवा ग्रामस्थांनी साखळी उपोषणाचा इशारा देताच उपअधीक्षक भूमी अभिलेख उरण यांच्या विनंती पत्रानुसार शासकीय मोजणी १ जुलैपासून करण्यात येणार असल्याचे लेखीपत्र तहसीलदार उरण यांनी नवीन शेवा ग्रामपंचायतीला देऊन साखळी उपोषण स्थगित करण्याची विनंती केली आहे. यावेळी माजी आमदार मनोहर भोईर, उपतालुकाप्रमुख व ग्राम सुधारणा मंडळाचे अध्यक्ष कमलाकर पाटील, सरपंच सोनल घरत, उपसरपंच रेखा म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य सतीश सुतार, वैशाली म्हात्रे, युवासेना माजी अध्यक्ष निलेश घरत, शेकाप गाव अध्यक्ष महेश म्हात्रे व उपशाखाप्रमुख अशोक म्हात्रे उपस्थित होते.

दरम्यान, पुनर्वसित नवीन शेवा ग्रामस्थ ३७ वर्षे न्यायासाठी विविध मार्गाने लढा देत आहेत.१ जुलै रोजी भूमी अभिलेख कार्यालयाकडून जागेची मोजणी होणार असल्याने लढा यशस्वी होणार, अशी आशा पल्लवित झाली आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी श्री. राजु भगवानदास अडवाणी यांच्या मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील मौजे आतोणे, ता. सुधागड. जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे- आतोणे, ता. सुधागड, जि. रायगड येथील**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| १९ | ०-४२.५० | २.४५ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू. हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकवीस (२१) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्री. राजु भगवानदास अडवाणी यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : ०१-०७-२०२४

**श्री. नरेश गोविंद शिंदे, अॅडव्होकेट**
पत्ता :- मु.पो.पाली भोईआळी, ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, मी खालील सही करणार अॅडव्होकेट खालील वर्णन केलेले मिळकतीचे मालक श्री. अनिल शंकर माईनकर इतर ७ यांचे मिळकतीचा मालकीहक्काचा दाखला (Title Certificate) देणेचा आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. हेदवली, सावले व मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| हेदवली | ८० | ५ | १-१७-०० | १-६० |
| | ८२ | १ | ०-४२-०० | ०-३९ |
| | ८२ | २ | ०-३३-०० | ०-०३ |
| | ८२ | ३ | ०-२७-०० | ०-२५ |
| | ८२ | ४ | ०-२६-०० | ०-२३ |
| | ८२ | ६ | ०-५२-०० | ०-४५ |
| | ८३ | १ | ४-१९-०० | ३-१२ |
| | ८७ | १ | १-४८-०० | १-१९ |
| | ८७ | २ | २-४१-०० | १-५६ |
| | ८७ | ३ | ४-९१-०० | ३-३८ |
| | ८७ | ४ | ०-७१-०० | ०-४५ |
| | ८८ | १ | ३-७१-०० | २-५१ |
| | ८८ | २ अ | १-३२-०० | ०-८७ |
| | ८८ | ३ | २-२३-०० | १-५० |
| मांडवणे | १५४ | १/अ/१ | १-५७-०० | १-०७ |
| सावळे | ८८ | २ | ४-५२-०० | ३-०० |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे.असे गृहीत धरून मी सदर मिळकतीचे मालकाचे नावे सदर मिळकतीचा मालकीहक्काचा दाखला (Title Certificate) देईल. मागाहून येणारी हरकत माझेवर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. /०६/२०२४.

**अॅड. संदीप हरिश्चंद्र मसणे,**
पत्ता - कोर्ट व्हिव अपार्टमेंट, फ्लॅट नं. कर्जत कोर्ट समोर, कर्जत, ता. कर्जत, १०१, जि. रायगड - ४१०२०१ मो. ९६०४५४५७७७

निवडक

## २२ वर्षीय तरुणी बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक २२ वर्षीय तरुणी कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कैलाशी नाईक असे तरूणीचे नाव आहे. चेहरा गोल, केस काळे मध्यम, वर्ण गोरा, बांधा मध्यम, डोळे काळे, नाक सरळ असून अंगात गुलाबी रंगाचा वनपिस व पायात काळ्या रंगाच्या सॅण्डल आहेत. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा.

## अनोळखी इसमाचा मृत्यू

**पनवेल :** खांदा कॉलनी येथे मध्यरेल्वेची पटरी ओलांडताना मालगाडीच्या धक्क्याने एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यु झाल्याची घटना घडली आहे. नवीन पनवेल सेक्टर ५ कडून खांदा कॉलनीकडे रेल्वे पटरी ओलांडताना एक ४० वर्षीय इसमाचा पनवेल रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या मालगाडीच्या धडकेने मृत्यु झाला आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल लोहमार्ग येथे संपर्क साधावा, असे आवाहन पनवेल लोहमार्ग पोलिसांनी केले आहे.

## दोन महिलांची सुटका

**पनवेल :** अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पथकाने शहरातील हॉटेल समीर लॉजिंग ॲण्ड बोर्डींग येथे छापा टाकून दोन पीडित महिलांची वेश्या व्यवसायातून सुटका केली आहे. महिलांचे फोटो दाखवून त्यांच्याकडून ४५०० रुपये घेतले. याची खात्री होताच वपोनि पृथ्वीराज घोरपडे यांच्या पथकाने छापा टाकून या दोन महिलांची सुटका केली आहे. तसेच आरोपी मॅनेजर नागराज शेट्टी, ब्यास यादव व राघुराम शेट्टी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## पोलीस उपायुक्तांना निवेदन

**पनवेल :** युवासेना उत्तर रायगड पनवेल आणि उरण विधानसभा पदाधिकाऱ्यांकडून पनवेल पोलीस उपायुक्तांना ड्रग्ज आणि नशायुक्त अमलीपदार्थ विरोधात कठोर कारवाई करण्याबाबत निवेदन देण्यात आले. पनवेल, खारघर, उरण आणि रायगड जिल्ह्या लगत असणाऱ्या शहरी आणि ग्रामीण भागात सर्रास विकल्या जाणाऱ्या गांजा, चरस, एमडी तसेच इतर अंमली पदार्थांसंदर्भात कडक कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन पोलीस उपायुक्त पानसरे यांनी दिले.

## दोघा इसमांना अटक

**पनवेल :** आरोपीने आपसात संगनमत करून एका तरुणीस वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडणाऱ्या दोघा इसमांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.आरोपी जोगिंदर गुप्ता व प्रशांत हेगडे यांनी एका तरुणीस प्रलोभन दाखवून वेश्या व्यवसाय करण्याकामी भाग पाडले. याची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने दोन आरोपींना ताब्यात घेवून अटक केली आहे. यांच्या अटकेमुळे पनवेल शहरातील अनेक अनैतिक धंदे उघडकीस येण्यास मदत होणार आहे.

# सात हजार निरक्षर झाले साक्षर

### नव साक्षरता अभियान परीक्षा

। रायगड । प्रतिनिधी ।

**रायगड जिल्ह्यात नवभारत साक्षरता अभियान राबविण्यात आले होते. या अभियान अंतर्गत नव साक्षर यांची मार्च महिन्यात लेखन, वाचन, संख्या या बाबत परीक्षा घेण्यात आली होती. प्रौढ असाक्षरांच्या पहिल्या परीक्षेत ८ हजार ४१४ नव साक्षर परीक्षेला बसले होते. यापैकी ७ हजार ७०४ निरक्षरांनी असाक्षरतेचा कलंक पुसला आहे. त्यामुळे आता त्यांना साक्षर असल्याचे प्रमाणपत्र मिळाले आहे. तर ७१० जणांना सुधारणा आवश्यक असल्याचे शिक्षण विभागातर्फे सांगण्यात आले.**



हे निकाल पुढे आले असतानाच आता २०२४-२५ या नव्या वर्षासाठी शिक्षकांना निरक्षर नोंदणीचे नवे टार्गेट ठरवून देण्यात आले आहे.प्रशासनाने दिलेल्या नव्या टार्गेटनुसार शिक्षकांना १५ हजार ३२९ प्रौढ निरक्षरांची नोंदणी करायची आहे. शिवाय जुन्या वर्षातील उर्वरित निरक्षरांसह यंदा परीक्षा घेण्याची तयारी शिक्षण विभागाने केली आहे.

नवभारत साक्षरता योजनेसाठी साक्षरतेकडून समृध्दीकडे हे ब्रीदवाक्य घेतले गेले. १५ वर्षे आणि त्याहून अधिक म्हणजे ३५ वर्षापर्यंतच्या निरक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता म्हणजे वाचन,लेखन, संख्याज्ञान, महत्त्वपूर्ण जीवन कौशल्य विकसित करणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. या वयोगटातील शिकाऊ व्यक्तींना मुलभूत शिक्षण देणे आहे. जिल्ह्यात आजही निरक्षक व्यक्ती आहेत. निरक्षक असल्याने अनेकांना व्यवहार ज्ञान मध्ये फसगत होत असते. अशा असाक्षर व्यक्तींना साक्षर बनविण्यासाठी नवभारत साक्षरता अभियान शिक्षण विभागातर्फे राबविण्यात आले होते. रायगड जिल्ह्यातही हे अभियान राबविण्यात आले होते. यामध्ये ८ हजार ४१४ असाक्षरांनी परीक्षा दिली होती. यापैकी ७ हजार ७०४ जण पास झाले आहेत.वैयक्तिक, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, प्रशासनिक अशा विविध कारणांमुळे साक्षरतेपासून वंचित राहिलेल्या जिल्ह्यातील १२ हजार ७१९ जणांनी असाक्षरतेचा कलंक पुसला पुसून टाकला. आता हे सर्वजण साक्षरतेचे बिरुद आपल्या नावाबरोबर अभिमानाने मिरवणार आहेत.

जिल्ह्यात असाक्षर यांची परीक्षा घेतली होती. यामध्ये असाक्षर व्यक्तींना साक्षर बनविण्याचा उद्देश शासनाचा आहे. जिल्ह्यातील ७१० आजी आजोबा याना अजून प्रगतीची गरज आहे. मार्च महिन्यात असाक्षर यांची परीक्षा घेण्यात आली होती. यामध्ये ७ हजार ७०४ जण उत्तीर्ण झाले आहेत. ७१० जणांना प्रगतीची गरज आहे. सप्टेंबरमध्ये पुन्हा असाक्षरांना दुसऱ्या चाचणीत उत्तीर्ण होण्याची संधी मिळणार आहे.

केंद्राकडून राबवण्यात येणारे हे अभियान २०२७ पर्यंत चालू राहाणार आहे. दरवर्षी नोंदणी व परीक्षार्थींचे टार्गेट ठरवून देण्यात येणार आहे त्यानुसार प्रशासनाला काम करावे लागणार आहे. रायगड जिल्ह्यात मागील वर्षाचा अनुभव पाहता २०२४-२५ या वर्षासाठी नवे टार्गेट देण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यात असाक्षर आजही अनेक आहेत. नवभारत साक्षरता अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबवले होते. यात चांगला प्रतिसाद मिळाला होता. तर पुढील वर्षासाठी १५ हजार ३२९ लक्षांक शिक्षण विभागाने डोळ्यासमोर ठेवले आहे.



## अमली पदार्थ सेवन विरोधी विद्यार्थ्यांची जनजागृती

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

अमली पदार्थ शरीरासाठी घातक आहे.तरी सुद्धा तरुण वर्ग यांचे सेवन करीत असतात.मात्र शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या लहान मुलांच्या वरती हे पदार्थ शरिरास घातक असून,त्यांचे दुष्परिणाम खूप भयंकर आहे.यांची एकदा यांची सवय लागली ते सुटणे जवळ-जवळ अशक्य होत असते. यामुळे रायगड जिल्हा परिषद शाळा वडगांव येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्ताने जागतिक अमली पदार्थ सेवन विरोधी मुख्याध्यापक सुभाष राठोड शिक्षक, विद्यार्थी यांनी जनजागृती रॅली काढण्यात आली.तसेच वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यावेळी या परिसरातील ग्रामस्थांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे पाहावयास मिळले.

यावेळी विद्यार्थ्यांनी हातात अमली पदार्थांच्या नावांचे फलक घेवून ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली.यावेळी तंबाखू, गुटखा,विडी, सिगार, दारु, ड्रग्स असे मानवी शरीरास घातक ठरत असलेल्या सर्वच नशेली पदार्थ सेवन करु नये असे प्रबोधन विद्यार्थ्यांनी या रॅलीमध्ये केले. यावेळी विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर पोस्टर रंगवणे याम ध्ये सर्वच विद्यार्थानी सहभाग नोंदविला असल्याचे पाहावयास मिळाले. स्पर्धेत उत्तम गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम स्वरूपात, बक्षिसे व वह्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा करुणा ठोंबरे, उपाध्यक्षा राजश्री जांभुळकर, शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन वैजनाथ जाधव यांनी केले तर प्रास्ताविक व आभार मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विषय शिक्षिका सरस्वती कवाद, स्वयंसेविका साक्षी, निकिता, भाग्यश्री, अकांक्षा व माजी विद्यार्थी ऋषिकेश जाधव, श्रुतिका जांभुळकर यांनी सहकार्य केले.

## ग्रीन अलिबागच्या वतीने दत्त टेकडीवर वृक्षारोपण

। अलिबाग । प्रतिनिधी ।

ग्रीन अलिबाग या संस्थेच्या वतीने दत्त टेकडी कुरुळ येथे विविध औषधी वनस्पती व निसर्गाला उपयुक्त अशा वृक्षांची लागवड करण्यात आली.

ग्रीन अलिबाग ही संस्था फेसबुकच्या माध्यमातून निर्माण झाली असून विविध क्षेत्रात व्यवसाय, उद्योग करणारे, शिक्षण घेणारे महाविद्यालयीन विद्यार्थी एकत्र येऊन करणात आली आहे. हा ग्रुप प्रशांत पाटील यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आला असून ७० सदस्य या ग्रुपमध्ये आहेत. या संस्थेमार्फत रविवारी दत्त टेकडी कुरूळ येथे वृक्ष लागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या सर्व सदस्यांनी दत्त टेकडी कुरूळ येथे सकाळी सात वाजता उपस्थित राहून वड, पिंपळ,




अशोक, सुरू, उंबर , करंज, जांभूळ, सिताफळ अशा विविध निसर्गाला उपयुक्त व औषधी वृक्षाची लागवड करण्यात आली. यावेळी संस्थेचे सदस्य प्रशांत पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार वृक्ष लागवड करण्यात आली.त्यानंतर सर्व सदस्यांची दत्तमदिर येथे बैठक होऊन पुढील कार्यक्रमाविषयी चर्चा करण्यात आली. प्रशांत पाटील यांनी सर्व सदस्यांचे आभार मानले.

## पदाधिकारी पदग्रहण सोहळा

। उरण । वार्ताहर ।

लायन क्लब ऑफ द्रोणागिरी आणि लिओ क्लब ऑफ द्रोणगिरीचा नवीन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा पांडुरंग पाटील स्कूल चारफाटा उरण येथे संपन्न झाला.

यावेळी सर्व लायन व लिओ पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. अध्यक्ष लायन सागर चौकर,उपाध्यक्ष लायन भूमिका सिंग, सचिव लायन मोनिका चौकर व खजिनदार लायन ॲड. दिपाली गुरव, लिओ अध्यक्ष लिओ ॲड .चेतन भोईर, उपाध्यक्ष लिओ सेजल ब्राह्मणे, सचिव लिओ विनीत कासकर, खजिनदार लिओ आरती सुरवसे या नवीन पदाधिकाऱ्यांना पदभार देण्यात आला. या नवीन पदग्रहण सोहळ्या निमित्त नाईक नगरच्या मुलांनी व उपस्थित सर्व पाहुण्यांनी सिड बॉलचे उद्घाटन केले त्याचबरोबर शैक्षणिक साहित्य वाटप ही करण्यात आले. यावेळी एन.आर परमेश्वरन,जेडेन सॉलोमन, अनुप थरवानी, नमिता मिश्रा, अल्केश शहा, सुयोग पेंडसे, सीमा घरत, मिलिंद पाटील आदी उपस्थित होते.

## बँकेची फसवणूक करून रकमेचा अपहार

। पनवेल । वार्ताहर ।

बँकेची फसवणूक करून दीड लाख रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी महिलेविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

फिर्यादी या स्टेट बँक ऑफ इंडिया नवीन पनवेल शाखेत शाखा व्यवस्थापक आहेत. या शाखेमध्ये २००८ ते २००९ दरम्यान फसवणूक करणारी महिला लोन डिपार्टमेंटमध्ये काम करत होत्या. या शाखेत फिलिप कुंवर आणि अलका राऊत यांच्या जॉईंट नावावर टर्म डिपॉझिट रक्कम तीन लाख ३१ हजार २८६ ही १२ महिन्यांच्या मुदतीसाठी ठेवली होती. या टर्म डिपॉझिट रिसीटवर स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, बुधेल, गुजरात या बँकेकडून तीन लाख २१ हजारांचे डिमांड कर्ज घेतले आहे. टीडीआरवर डिमांड कर्ज घेतलेल्या असल्यामुळे पुन्हा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेकडून नव्याने कर्ज घेऊ शकत नाही असे असताना त्या महिलेने स्टेट बँक ऑफ इंडिया, नवीन पनवेल या बँकेत डेप्युटी मॅनेजर या पदावर कार्यरत असताना पदाचा दुरुपयोग करून व बँकेची फसवणूक करण्याच्या उद्देशाने टर्म डिपॉझिट रिसीटच्या आधारे व त्याचा गैरवापर करून नवीन बोगस व खोटे डिमांड कर्ज खाते २००९ रोजी कम्प्युटर राईज सिस्टीममध्ये तयार केले आणि डिमांड खर्चाकरता खोटे व बोगस असे कर्ज प्रकरण तयार करून त्यावर आरोपीने तिच्या हस्ताक्षरात भरले आहे.कर्ज रक्कम दीड लाख ही त्याच वेळेस काढली आणि स्वतःच्या बँकेतील करंट अकाउंटमध्ये जमा करून घेऊन त्या रकमेचा अपहार केला.

## खारघरमध्ये ५२ लाख रुपयांची घरफोडी

**पनवेल :** बुधवारी सेक्टर १२ मधील एका रो हाऊसमध्ये तीन चोरट्यांनी घरात शिरुन तब्बल ५२ लाख रुपयांचे सोन्याचांदीचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली. याबाबत गुरुवारी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. खारघरमधील साई कुंज बंगल्यामध्ये ही चोरी झाली असून या बंगल्यामध्ये राहणाऱ्या रीतू पांडे यांनी याबाबतची तक्रार दिली आहे.

सीएनजी स्टेशनचे मालक बना!
MAHANAGAR GAS
हरितक्रांतीत सहभागी व्हा
SUPERB RETURNS* ON INVESTMENT




किमान आवश्यक क्षेत्र
मुंबई आणि ठाणे* — *शहापूर व मुरबाड तालुके वगळुन — 500 चौ. मी.
रायगड# — *कृपया ठिकाणांच्या सूचीसाठी वेबसाइट पहा — 1225 चौ. मी.
अर्ज करण्यासाठी
भेट द्या: www.mahanagargas.com
सीएनजी → डिलर झोन → सीएनजी रिटेल आऊटलेटसाठी अर्ज
लगेच अर्ज करण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा!
अधिक माहितीसाठी,
मुंबई आणि ठाणे जिल्हा: 82910 90804
रायगड जिल्हा: 86574 10741
24/7 कॉल सेंटर: 022 6867 4500/6156 4500
Switch to MGL eCNG
eco friendly | easily available | economical
indhan hariyali ka
**नियम व अटी लागू

पावसाची कृपादृष्टी; बळीराजा सुखावला

# आले भात लावणीचे दिवस

। पाली । वार्ताहर ।

**मागील दोन तीन दिवसांत जिल्ह्यात दिलासादायक पर्जन्यवृष्टी झाल्याने बळीराजा सुखावला आहे. सध्या भात रोपे तरारली असून शेतकरी भात लावणीच्या कामात लागू लागले आहेत. या कामासाठी मजूर मिळणे सध्या अवघड झाले आहे. शिवाय मजुरी देखील वाढली आहे. अशावेळी सारे कुटुंबातील सदस्य तसेच शहरात गेलेले चाकरमानी खास लावणीसाठी येऊन लावणीच्या कामात गुंतले आहेत. काही ठिकाणी भात लावणीचा इव्हेंटदेखील साजरा केला जात आहे.**



### भात लावणीचा इव्हेंट

अनेक कृषी पर्यटका तसेच प्रयोगशील शेतकरी शहरातील नागरिकांना तसेच होतकरू तरुणांना शेतीच्या कामांमध्ये सहभागी करून घेतात. भात लावणीचा इव्हेंटच तिथे होतो. सुधागड तालुक्यातील उद्धर येथील प्रयोगशील शेतकरी व कृषी पर्यटन चालविणारे तुषार केळकर यांनी आपल्या आत्मतृप्ती या कृषी पर्यटन केंद्रावर भात लावणीचा इव्हेंट ठेवला होता. यामध्ये भाताची शेती कशी होते. कोणत्या जातीचा भात आहे, या सगळ्याची शास्त्रशुद्ध माहिती देऊन भात लावणी कशी करावी हे प्रत्यक्ष कृतीतून दाखवण्यात आले. भात लावणी बरोबरच उपस्थितांनी मढ बाथचा म्हणजे चिखलातील आंघोळीचा आनंद देखील घेतला. तसेच ट्रॅक्टर सफारी, नदी व धबधब्यावर आंघोळ, गावाची सफर आदी उपक्रम यावेळी राबवण्यात आले. शहरातील अनेक तरुण व नागरिकांनी या इव्हेंटमध्ये सहभाग घेऊन भात लावणी करत मजा केली. घरगुती जेवणाची चव देखील चाखली,असे तुषार केळकर यांनी सांगितले.

शेतकरी लावणीची कामे पूर्ण करण्यासाठी अदिवासीवाडी व गावा गावात जाऊन मजूर शोधण्यासाठी फिरत आहे. मात्र अनेक आदिवासी कुटुंब रोजगारासाठी स्थलांतर झाल्यामुळे मजूर मिळणे कठीण झाले आहे. तर ज्याच्याकडे बैल जोडी नाही त्यांना दुसऱ्याच्या भरवशावर आपल्या लावणी साठी प्रतीक्षा करावी लागत आहे. मग काय शेतकरी राजाने आपल्या कुटुंबातील व नात्यातील मंडळींना घेऊन भात लावणीच्या कामास सुरुवात केली आहे.

शेतकऱ्यांसाठी भातलावणी हा जणूकाही एक स्नेह मेळावाच असतो. पावसाळ्यात हिरवाईने नटलेल्या डोंगरदऱ्यांच्या कुशीत असलेल्या शेतांमध्ये सुरू असलेली भातलावणी म्हणजे आंनद सोहळाच असतो. दुपारचे जेवण सोबत घेऊन सकाळी लवकर कुटुंब शेताकडे रवाना होते. भर पावसात वेगाने भातलावणी करण्याचे त्यांनी ठरवलेले असते. या वेळी मनोरंजनासाठी महिला गावाकडची जुनी पारंपरिक गाणी, ओव्या धावलारी भातलावणी करतात. पुरुष मंडळी त्यांना दाद तर देतातच, अन् कधी कधी गाण्याचीही साथ देतात. दुपारच्या जेवणानंतरही सूर्यास्तापर्यंत हा उपक्रम सुरू असतो. बच्चेकंपनी सुद्धा भात लावणीच्या कामात गुंतते.

> कुटुंबासमवेत भात लावणी म्हणजे एक पर्वणीच आहे. दरवर्षी या क्षणाची वाट पाहत असते. सध्या शेतमजूर मिळणे कठीण झाले आहे. शिवाय मजुरी देखील वाढली आहे. त्यामुळे नातेवाईक व कुटुंबीयांना घेऊन भात लावणी करते, यावेळी खूप गप्पागोष्टी व मौज मस्ती असते. घरातील लहानगेदेखील मोठ्या उत्साहात या भात लावणीमध्ये सहभागी होतात. त्यामुळे शेतीचे महत्व देखील त्यांना कळते.
>
> निहारिका शिर्के, शेतकरी, पुई, सुधागड

# बावीस हातांचा विजय

टी-ट्वेंटी विश्वचषकातील भारताचा विजय अनेक अर्थांनी प्रशंसनीय आहे. क्रिकेट हा सांघिक खेळ आहे. पण प्रत्यक्षात आजवर कोणी एक गावसकर, कपिल देव, तेंडुलकर किंवा धोनी यांच्या जिवावर भारत जिंकत आल्याचे भूतकाळातील दाखले आहेत. भारताच्या बहुतांश विजयांमध्ये त्या त्या दिवशी एक किंवा दोन खेळाडूच सर्वाधिक चमकलेले दिसतात. बार्बाडोसचा अंतिम सामना हा मात्र अकरादुणे बावीस हातांचा विजय ठरला. विराट कोहलीच्या ७६ धावांइतक्याच अक्षर पटेलच्या ४७ धावा मोलाच्या ठरल्या. हार्दिक पांड्याने निर्णायक क्षणी उंचावलेला खेळ हा महत्वाचा ठरला. बुमरा हा या क्षणीचा जगातला सर्वोत्कृष्ट गोलंदाज आहे. त्याने चार षटकात केवळ अठरा धावा देऊन दोन बळी घेतले. पण जवळपास तितकीच उत्कृष्ट कामगिरी अर्शदीपने केली. आणि, सूर्यकुमार यादवने घेतलेला जबरदस्त झेल हा सामना फिरवणारा ठरला. थोडक्यात, कोण्या एका खेळाडूच्या पराक्रमामुळे हे जेतेपद मिळालेले नाही. संघातील प्रत्येकाचा यात वाटा आहे. या स्पर्धेतील सर्व सात सामने भारताने जिंकले होते. त्या सर्वच सामन्यांमधील धावा व बळी पाहिले तर हीच स्थिती आहे. हरेक खेळाडूने मोक्याच्या क्षणी काही नाही काही योगदान दिलेले दिसते. अंतिम सामन्यात तर यावर कळस चढला. त्यामुळे हा विजय विशेष देदिप्यमान झाला. अंतिम सामन्यातील प्रतिस्पर्धी दक्षिण आफ्रिकेने देखील एकही सामना गमावलेला नव्हता. उपांत्य लढतीत अफगाणिस्तानला साठ धावांच्या आत उखडून टाकून आलेले असल्याने त्यांचा आत्मविश्वास व जिंकण्याची इच्छा जबरदस्त होती. भारतासमोरचे आव्हान सोपे नव्हते. त्यामुळे भारताचा सामन्यात पुरेपूर कस लागला व म्हणूनच नंतर मिळालेला विजय हा महान ठरतो. नाणेफेक जिंकून भारताने प्रथम फलंदाजी घेतली. पण नंतर त्याने झटपट गडी गमावले. ते कसेबसे १७६ धावांपर्यंत पोचले. नंतर आफ्रिकेने पहिले दोन गडी लवकर गमावले तरी त्यांनी मधल्या फळीत व षटकांमध्ये चांगलाच आक्रमक खेळ केला. त्यामुळे एक वेळ अशी आली की, तीस चेंडूत तीस धावा असे अतिशय सोपे समीकरण त्यांच्यापुढे होते. पण त्यानंतर भारताने जे काही केले ते केवळ अद्भुत होते.

## चिवट झुंज

अशा रीतीने शेवटपर्यंत चिवट झुंज देणे व सामना फिरवणे हे ऑस्ट्रेलियन संघाचे वैशिष्ट्य आहे. आपल्याला त्याची चव अनेकदा चाखावी लागलेली आहे. पण भारतीय संघाने त्याचे घडवलेले दर्शन हे सुखावह होते. गेल्या वर्षी पन्नास षटकांच्या विश्वचषक स्पर्धेतही भारताने सर्वच्या सर्व साखळी सामने जिंकले होते. स्पर्धा भारतात म्हणजे घरच्या मैदानावर होती. त्यामुळे अंतिम लढतीत ऑस्ट्रेलियाला आपण हरवू असे सर्वांना वाटत होते. पण त्या दिवशी आपला सर्वच संघ खराब खेळला. त्याही आधी कसोटींच्या विश्वचषकामध्येही हेच घडले होते. आधी सातत्याने उत्तम कामगिरी करणारा संघ एकदा न्यूझीलंडकडून तर एकदा इंग्लंडकडून हरला होता. यंदा या सर्व पराभवांचे परिमार्जन झाले असे म्हणता येईल. विशेष म्हणजे या स्पर्धेच्या साखळीमध्ये आपण ऑस्ट्रेलिया, इंग्लंड व पाकिस्तान या चांगल्या तसेच आपल्या पारंपरिक प्रतिस्पर्धी संघांना चांगल्या रीतीने पराभूत केले. पाकिस्तानसमोर तर आपली धावसंख्या जेमतेम ११९ असूनही आपण त्यांना त्याच्याही आत गुंडाळले. ऑस्ट्रेलियालाही त्यांची चिवट वृत्ती आपल्याविरुध्द दाखवता आली नाही. वास्तविक हा संघ विश्वचषकासाठी निघाला तेव्हा क्रिकेटप्रेमींना फार आशा नव्हत्या. जवळपास जाण्याच्या दिवसापर्यंत आपले खेळाडू आयपीएल खेळत होते. भयानक कडक उन्हातल्या तीन महिन्यांच्या स्पर्धेमुळे त्यांना अजिबात विश्रांती मिळालेली नव्हती. शिवाय, सर्वच जण वेगवेगळ्या संघांमध्ये असल्याने संघ म्हणून तयारी काहीच नव्हती. शुभमन गिल अशासारख्यांना वगळण्याचा निर्णय चांगला असला तरी पंतला खेळवणे आश्चर्याचे वाटत होते. कारण तो नुकताच दुखापतीतून उठला होता. हार्दिकची आयपीएलमधील कामगिरी वाईट होती. सूर्यकुमार, शिवम दुबे, संजू सॅमसन किंवा यशस्वी जयस्वाल यांच्यात सातत्य नव्हते.

## द्रवीडचे योगदान

तरीही शेवटी भारत जिंकला. कारण, परिपूर्ण संघ ही कल्पना अशक्यप्राय आहे. त्यामुळे निवडलेल्या प्रत्येकाने आपापला हातभार लावणे हेच यशाचे गमक आहे. ते भारताला साधले. कपिल देवच्या १९८३ मधील संघात गावसकर, मोहिंदर असे अनुभवी होते. पण पन्नास षटकांच्या सामन्यासाठी त्यांचा कमी उपयोग होता. याउलट २००७ मधील धोनीच्या संघातून सचिन, सौरव वगैरे लोकांना मुद्दाम वगळून एकदम एकदम तरुण लोकांना संधी देण्यात आली होती. त्यातील जोगिंदरसिंग, आरपी सिंग यांना पुढे फार चमक दाखवता आली नाही. पण तेव्हा धोनीने त्यांचा योग्य वापर करून घेतला. तेव्हा खुद्द धोनीही अनुभवीच होता. पण जिंकण्याच्या ईर्षेने ते खेळले. यंदाच्या संघात रोहित हा चाळिशीच्या जवळ आलेला. विराटही पस्तिशीतला. बाकीच्या खेळाडूंमध्ये आयपीएलमुळे बरेच खेळलेले पण भारतातर्फे आंतरराष्ट्रीय सामने फारसे न खेळलेल्यांचा भरणा अधिक होता. तरीही संघ उभा राहिला. यात प्रशिक्षक राहुल द्रवीड यांचाही मोठा वाटा आहे. पन्नास षटके तसेच कसोटी सामन्यांच्या विश्वचषकाने त्यांना हुलकावणी दिली. पण त्यांनी जिद्द सोडली नाही. खेळाडूंचा विश्वास जिंकला. जे खेळाडू संघात नसतील त्यांच्याशीही योग्य संवाद ठेवला. रोहितने आरंभापासून प्रतिपक्षावर हल्ला करण्याचे डावपेच आखले. अनेकदा ते फसले तरीही ते त्यापासून हटले नाहीत. सिराजला न खेळवणे कदाचित महागातही पडू शकले असते. पण ती जोखीम पत्करली. आता द्रवीड निवृत्त होत आहेत. रोहित, विराट, जडेजा हे मावळतीकडे आहेत. नव्या कर्णधाराला नव्या संघाची उभारणी करावी लागेल. आयपीएलमुळे भारतात गुणी खेळाडूंची खाणच तयार झाली आहे. मात्र त्यातून प्रचंड पैसा मिळत असल्याने इशान किशन किंवा ऋतुराजसारखे खेळाडू आयपीएलपुरतेच राहण्याला अधिक पसंती देत असल्याचे दिसते. अनेक जण काही काळापुरते चमकतात व लुप्त होतात. हाही आयपीएलच्या अतिताणाचा परिणाम आहे काय याचा विचार करायला हवा. तूर्तास मात्र आपल्या संघाचे हार्दिक अभिनंदन.

विचार

# प्रतिष्ठा जपायला हवी

*एक जुलैच्या राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त रुग्णांना व्याधीमुक्त करणाऱ्या वैद्यकीय तज्ज्ञांप्रती कृतज्ञता व्यक्त करायलाच हवी. मात्र दुसरीकडे या क्षेत्राच्या प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे काही मुद्देही यानिमित्ताने चर्चेत आणायला हवेत. आर्थिक लाभापोटी आपल्या पदाचा गैरवापर करणाऱ्या डॉक्टरांना 'धन्वंतरी' कसे म्हणायचे, असा प्रश्न एकिकडे पडत असताना प्रामाणिक डॉक्टरमंडळींना योग्य सन्मान मिळतो का, हे ही तपासावेसे वाटते.*

**डॉ. अजिंक्य बोराडे**



आरोग्यविषयक जाणीवा सजग असणाऱ्या या काळात डॉक्टरांचे महत्त्व अनन्यसाधारण पद्धतीने वाढणे स्वाभाविक आहे. त्यामुळे यंदाचा डॉक्टर दिन साजरा करताना या क्षेत्रातील तज्ज्ञांप्रती कृतज्ञता व्यक्त करायलाच हवी, मात्र त्याचबरोबर त्यांनी सांगितलेला, सुचवलेला दिनक'म अनुसरुन त्यांच्या उपचारांचा मानही राखायला हवा. देह आहे तिथे आजार असणारच... या न्यायाने अगदी पूर्वीपासून माणसाला आरोग्यशास्त्र आणि त्याच्याशी संबंधित विविध शाखांमधील तज्ज्ञांची गरज भासते आहे. मात्र पूर्वीच्या आणि सध्याच्या जीवनशैलीत मोठे अंतर आहे. पूर्वीची जीवनसरणी निसर्गाशी निगडित होती. माणसाची सगळी कर्मे त्या अनुषंगाने निश्चित केली होती. मात्र काळ बदलला तसा हा प्रवाहही बदलला. स्थलांतर, देशांतर वाढल्याने प्रत्येकाचा परीघ विस्तारला आणि अन्य अनेक प्रकारांबरोबरच आरोग्यावरही त्याचे बरे-वाईट परिणाम दिसून आले.

सहाजिकच आजच्या पिढीचे आरोग्यविषयक प्रश्न, आजचे आजार पूर्वीपेक्षा वेगळे आणि अधिक आव्हानात्मक आहेत. आजारांच्या बदलत्या स्वरुपाप्रमाणेच आजारी पडण्याचे, व्याधीग'स्त होण्याचे, अनारोग्य अनुभवण्याचे वयही खूप कमी झाले आहे. त्यामुळेच डॉक्टरी पेशा स्विकारणाऱ्या आणि या माध्यमातून सर्वसामान्यांच्या आरोग्याची जपणूक करणाऱ्यांची जबाबदारी मोठ्या फरकाने वाढली आहे. एकीकडे मानवी आरोग्य सुधारण्यासाठी, व्याधी नियंत्रणात ठेवण्यासाठी तसेच रोगाच्या गंभीर अवस्थेतून रुग्णाला बाहेर काढण्यासाठी औषधे, उपकरणे, चिकित्सेच्या विविध पद्धती आदींची मदतही वाढत आहे तर दुसरीकडे आजारांमुळे जर्जर अवस्थेत जगणाऱ्यांचे आरोग्य जपण्याची कसरत करण्यात आज हा वर्ग बुडून गेला आहे. कोणत्याही दवाखान्यासमोरची वाढती गर्दी हे सप्रमाण सिद्ध करते. म्हणूनच आजच्या या आधुनिक धन्वंतरींसमोरचे प्रश्न लक्षात घेणेही गरजेचे ठरते. अर्थात प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. त्यामुळे नाण्याची दुसरी बाजू तपासून पाहत असताना या वर्गावरील आक्षेपांची नोंद घेतल्याशिवाय पुढे जाणे शक्य होणार नाही. रुग्णाची काळजी घेण्यात राहिलेली कमतरता किंवा रोगाचे निदान करताना चुकलेला अंदाज या बाबी नेहमीच चर्चेत असतात.

एखाद्या डॉक्टरविरुद्ध दाखल झालेल्या फौजदारी खटल्यात निष्काळजीपणा हा पुरावा म्हणून ग'ाह्य धरता येणार नाही, असा निर्णय काही वर्षांपूर्वी लुधियाना उच्च न्यायालयाने दिला होता. त्यानंतर मात्र अशा आरोपाची चिकित्सा एक्सपर्ट कमिटीने केल्यानंतरच डॉक्टर मंडळींवर निष्काळजीपणाचे आरोप निश्चित होतील, असे सर्वोच्च न्यायालयाने जॅकब मॅथ्यू प्रकरणात म्हटले. म्हणजेच कोणत्याही डॉक्टरने सामान्य परिस्थितीत करता येण्याजोगे उपचार केले नाहीत किंवा उपचारादरम्यान त्याच्याकडून गंभीर चूक झाली तरच संबंधित डॉक्टरविरुद्ध फौजदारी खटला दाखल करता येईल, असे न्यायालयाने त्या निकालाच्या निमित्ताने स्पष्ट केले. एखाद्या डॉक्टरविरुद्ध केवळ फौजदारी गुन्हा दाखल झाला म्हणून अटक करता येणार नाही, असेही या आदेशात नमूद करण्यात आले होते. मात्र कायद्यानुसार आणि एकूणच डॉक्टरमंडळींचे काम, त्यांनी दिलेले उपचार नीट समजून घेतल्यानंतरच याबाबत बोलता येऊ शकते, हे नक्की.

डॉक्टरांनी व्याधीचे नेमके निदान करून परिपूर्ण उपचार द्यावेत, अशी वेदनेने त्रस्त असणाऱ्या रुग्णाची इच्छा असते. देशातले बहुतांश रुग्ण सर्वसामान्य आर्थिक वर्गातले असतात. कुटुंबातल्या सदस्याच्या उपचारापोटी झालेल्या खर्चाने त्याचे कंबरडे मोडलेले असते. त्यातून डॉक्टरांनी निष्काळजीपणा दाखवला तर दाद मागण्यासाठी न्यायालयातील खर्च त्याला परवडेलच असे नाही. मुळात डॉक्टरांच्या हातून झालेल्या चुका पडताळण्यासाठी न्यायालयाला संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांचीच मदत घ्यावी लागणार आहे. त्यामुळे न्यायप्रकि'येत सहभागी डॉक्टर दोषी डॉक्टरांच्या चुकीकडे सहानुभूतीने बघण्याची शक्यता नाकारता येणार नाही. हे लक्षात घेता न्यायालयाकडे तयार नियमावली असायला हवी. अशी नियमावली तयार करण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र तोपर्यंत एखाद्या रुग्णाला चुकीचे उपचार मिळाल्यास त्यांचे काय होणार हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

आज अनेक डॉक्टरमंडळी अतिशय चांगले काम करताना दिसत असली तरी आजवर डॉक्टरांच्या हलगर्जीपणाच्या अनेक कथा प्रसृत झाल्या आहेत. शस्त्रकि'येदरम्यान कात्री, फोर्सेप, सर्जिकल नाईफ अशी उपकरणे, कापसाचे बोळे, स्पंज रुग्णाच्या शरीरातच राहणे अशा प्रकारचा गलथानपणा वेळोवेळी प्रकाशात आला आहे. डॉक्टरांच्या सहाय्यकांच्या हातून इतरही चुका होत असतात. त्या प्रकाशात न आल्यास होणारे नुकसान मोठे असते. उदा. वरिष्ठ डॉक्टरांनी दिलेली औषधे साईड इफेक्ट लक्षात न घेता रुग्णाला देणे, परिणामकारकतेचे प्रमाण लक्षात न घेता औषधे देणे अशा प्रकारच्या चुकांमुळेही रुग्णाचे आयुष्य धोक्यात येत असते. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने डॉक्टरांसोबत काम करत असलेल्या सहाय्यकांच्या हातून होत असणाऱ्या चुकांबाबतही विचार करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त दुसरी बाजू समजून घेताना या सर्व बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यातच पुण्यातील हिट अँड रन प्रकरणी अल्पवयीन मुलाला वाचवण्यासाठी रक्ताचे नमुने बदलण्यास डॉक्टरांनी केलेली मदत लक्षात घेता, अशा अयोग्य प्रवृत्ती या क्षेत्राची प्रतिमा मलीन करता असल्याचे सत्यही धोका सांगून जाते. म्हणूनच त्यांना अटकाव करण्याचे उपायही या क्षेत्राने योजायला हवेत.

अलिकडे वैद्यकशास्त्राच्या अनेक शाखांचा विस्तार झाला आहे. ॲलोपॅथी परिणामकारक असल्याचे लक्षात येताच आयुर्वेदानेही तिचा अंगिकार केला. अलीकडे आयुर्वेदातील तज्ज्ञही ॲलोपॅथीमधील औषधे देतात. पण आयुर्वेदातील तज्ज्ञ व्यक्तीने ॲलोपॅथीची औषधे वापरून उपचार देताना रुग्णाच्या जीविताला धोका उत्पन्न झाल्यास कायद्यातर्फे कोणती कारवाई केली जाईल हे अद्याप स्पष्ट नाही. वैद्यकशास्त्रातील आयुर्वेद, ॲलोपॅथी या प्रमुख शाखांच्या जोडीला होमिओपॅथी, नॅचरोपॅथी, ॲरोमाथेरपी अशा अनेक शाखा विकसित झाल्या आहेत. या शाखांचे अभ्यासक'म पत्राद्वारे उपलब्ध असतात. एखादी कामचलाऊ पदवी धारण करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींना ही प्रमाणपत्रे सहज उपलब्ध होतात. मात्र त्या शाखांमधील उपचारांची परिणामकारकता हा भाग अद्यापही अनुत्तरीत आहे. त्यातच संपूर्ण देशभर अनेक बोगस डॉक्टर सुखनैव वैद्यकीय व्यवसाय करत आहेत. नीट परीक्षेचा वाजलेला बोऱ्या आणि त्यासंबंधी चर्चेत असणारे ताजे पेपरफुटीचे प्रकरण या क्षेत्राचे भविष्य किती धोक्यात आहे, हे सांगण्यास पुरेसे आहे. आधीही बोगस डॉक्टरांमध्ये आर. एम. पी., ए. व्ही. पी. वगैरे पदव्या मिळवून वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांची सं'या अधिक होती. सध्या निसर्गोपचार अथवा पर्यायी उपचार पद्धतींशी संबंधित अभ्यासक'म पोस्टाद्वारे पूर्ण करून काही मंडळी स्वत:ला 'डॉक्टर' म्हणवून घेतात. तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार मिळण्यापूर्वी रुग्णांना अशा अनेक अकार्यक्षम डॉक्टरांना सामोरे जावे लागते. ही बाबही डॉक्टरमंडळींवरील आक्षेपांचा वेध घेताना लक्षात घ्यायला हवी. अर्थातच ही नाण्याची दुसरी बाजू आहे. अशा काही लोकांमुळे पहिल्या बाजूचे महत्व कुठेही कमी होणार नाही.

चुकीचे उपचार दिल्यानंतर काही परिणाम चटकन जाणवत नाहीत. परंतु कालांतराने मोठी व्याधी उद्भवल्यानंतर त्या मागे चुकीचे उपचार हे एक कारण असल्याचे लक्षात येते. अर्थात ते एकमेव कारण नसते. मात्र या काळात रुग्णानेच पथ्य पाळण्यात कसुर केली आणि त्यामुळेच त्याचा आजार बळावला असण्याची शक्यता असते. डॉक्टरांच्या बाजुने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या बाजुचाही विचार करायला हवा. अशा सर्व मुद्द्यांच्या मुळाशी आहे या व्यवसायात येण्याआधी कराव्या लागणाऱ्या खर्चाचा पैलू. अलीकडे पैशांच्या जोरावर वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळवणे सुकर झाले आहे. डॉक्टर बनण्यासाठी लायक नसणाऱ्या व्यक्तीही काही लाख रुपयांची देणगी देऊन या अभ्यासक'मांसाठी प्रवेश घेते. या चुकीच्या प्रकि'येतून दर वर्षी विविध महाविद्यालयांमधून हजारो डॉक्टर्स बाहेर पडतात. नव्याने व्यवसायात आलेले हे डॉक्टर भरमसाठ फी आकारून उपचार देऊ करतात. कालांतराने रुग्णांची सेवा करणे मागे पडून शिक्षणापायी झालेला खर्च वसुल करण्याला प्राधान्य दिले जाते. असे अनेक प्रवाह आणि प्रघात या परिस्थितीमागे आहेत. म्हणूनच राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त या वर्गाचे महत्त्व आणि मर्यादा समजून घेण्याची गरज आहे. तरच सुधारणा घडवून प्रतिमा सुधारण्याचे प्रयत्न करण्यास वाव राहील.

आजकाल

# पालघर लोकसभा निवडणुकीत पैशांचा पाऊस

**रमाकांत पाटील**




तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात प्रचंड विजय मिळवलेल्या एका निवडणुकीत हा विजय कशाचा, शाईचा की बाईचा ही घोषणा गाजली होती. भाजपाचे डॉ हेमत सवरा यांच्या विजयानंतर किंबहुना त्यापूर्वी आता अशाच प्रकारची चर्चा रंगली आहे ही चर्चा आहे, हा विजय निखळ भाजपा-शिंदे सेनेचा की आदल्या दोन दिवसातल्या अवेळी कोसळलेल्या पावसाचा ? अर्थात बहुजन विकास आघाडीचे हितेंद्र ठाकूर यांनी एका सभेमध्ये या चर्चेला तोंड फोडले होते. ढेकाळे जवळील फर्न ह्या हॉटेलमध्ये काय चालले आहे ? तिथे कोण उतरले आहेत आणि तिथे नेमक काय होते हे एकदा सर्वांनी पहावं असे जाहीर आव्हान ठाकूर यांनी त्यावेळी दिलं होतं. निवडणूक आयोगासाठी, इथे नेमलेल्या निरीक्षकासांठी देखील ही एक सूचनावजा तक्रार होती. मात्र त्या काळात याकडे लक्ष दिले गेले नाही. ठेकेदारांची बैठकही येथेच पार पडल्याचीही वदंता त्या काळात होती.

असे म्हणतात की निवडणुकीच्या आधीच्या पावसाचे आगमन याठिकाणापासून झाले आणि पुढे हा पाऊस वसई, नालासोपारापासून थेट विक्रमगड, मोखाडा, वाडा, तलासरी, डहाणू, पालघर अशा सर्व भागात पोचला. या पावसाने किती जणांना ओलेचिंब करून सोडले याची गणतीच नाही. हवामान खात्याने दिलेल्या आकडेवारीनुसार काही बुथवर हा पाऊस दीड मिलिमीटर ते काही ठिकाणी दोन अडीच मिलिमिटर इतका कोसळला. तत्पूर्वी गावपाड्यांवर तर हा पाऊस धुवाधार बरसलाच पण पीक भरभरून यायला हवं म्हणून हा पाऊस आडोशाला देखील वळला. काही प्रमुख ठिकाणी तर हा पाऊस पाच मिलिमीटर पासून २५ ते ५० मिलीमीटर किंवा शंभर मिलिमीटर इतकाही धुवाधार कोसळळ्याची चर्चा आहे.

समुद्र किनाऱ्यावर, एरवी वादळी वारे वाहत असतात. पण यावेळी समुद्रकिनाराही पावसाने झोडपून काढल्याची चर्चा आहे. वाढवण बंदरच यात वाहून जाणार की काय, अशीच परिस्थिती या तुफानी पावसात ओढवली होती. त्यातच ठाण्याहून आलेल्या एका ढगाने यात आणखी भर घातली. फर्ननंतरच्या ह्या ढगफुटीने तर पावसाच्या नोंदीत तुफान भर घातली. पवार साहेबांनी भर पावसात जिंकता येत हे दाखवून दिलं आहे. आपणही यात कुठं कमी पडायचं नाही, असाच ह्या ठाण्याच्या ढगाचा संदेश होता म्हणे.

असं म्हणतात की फर्न हॉटेलमध्ये तर ढगफुटीच झाली होती या हॉटेलला पाऊस भरून घेऊन येणाऱ्या ढगांना एक विशेष नावही दिले गेले होते अशीही चर्चा आहे या पावसाने केवळ भाजपप्रदेशात किंवा शिवसेना प्रदेशात किंवा रिपाईच्या गावांना ओलेचिंब केले असे नाही तर इतरेजणांवरही पावसाने आपल्या धारा ओतल्याची चर्चा आहे. अचानक आलेल्या या इतरेजणांकडील पावसामुळे काही जण मग घरातून बाहेरच पडू शकले नाहीत तर काहींनी आपला मार्ग वळवल्याचीही चर्चा आहे.

असं म्हणतात की काहींनी आपल्यापर्यंत पोचलेले हे ढग आपल्या घरापर्यंत आणून घरातील पेटीत बंदही करून ठेवले आहेत. या दडवून ठेवलेल्या ढगांचा पाऊस यथावकाश बरसेलही. पण तो त्यांच्या त्याच्या परसात बरसेल आणि तो बरसेल तेव्हा इतरांनाही त्याचे दर्शन घडेल हे सांगायला नकोच. कमळ चिखलात फुलतं हे आजवर सर्वांना ठाऊक होतं. पण पालघरने अचानक बरसलेल्या पावसामुळे कमळ फुलल्याचा अनुभव जगाला दिला.

लोकसंसद

## शेवटी जिंकलोच! १३ वर्षांचा दुष्काळ संपला!

भारतीय संघाने कॅरिबियनमधील बार्बाडोसच्या केन्सिंग्टन ओव्हल स्टेडियमवर इतिहास रचला. टी ट्वेन्टी विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा सात धावांनी पराभव करून विश्वचषकावर आपले नाव कोरले. अत्यंत अटीतटीचा आणि चुरशीच्या झालेल्या या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने जवळ जवळ हा सामना आपल्या खिशात घातला होता. दक्षिण आफ्रिकेच्या हेन्रिच क्लासेनने प्रतिहल्ला चढवून अक्षर पटेलच्या एका षटकात जेव्हा २४ धावा ठोकल्या तेव्हा मायदेशात या सामन्याचे टीव्हीवर प्रक्षेपण पाहणाऱ्या कोट्यवधी क्रिकेट रसिकांच्या तोंडाचे पाणी पळाले होते. गेल्या वर्षीच्या अहमदाबादच्या वनडे विश्वचषकाचा पुनरावृत्ती होते की काय असे वाटत होते. पण हार्दिक पंड्याने क्लासेनचा झंझावात संपवल्यावर अत्यंत धाकधुकीच्या स्थितीत शेवट गोड झाला. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ जिंकला. अनेक वर्षे निरनिराळ्या स्पर्धांमध्ये उपविजेतेपदावर समाधान मानाव्या लागलेल्या भारतीय संघाला शेवटी तब्बल १३ वर्षांनी विश्वविजेते पद लाभले. सर्व भारतीय खेळाडूंना अश्रू अनावर झाले. अर्थात ते आनंदाश्रू होते. दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंनाही अश्रू अनावर झाले होते. कारण तब्बल २५ वर्षांनंतर हातातोंडाशी आलेला घास भारतीय संघाने हिरावून घेतला होता. भारतीय क्रिकेट संघाचे अभिनंदन!

**- प्रदीप मोरे, अंधेरी**

मराठी साहित्यिक दिनविशेष

**१ जुलै**

**१९०६:-** ललित व वैचारिक लेखन करणाऱ्या गांधीवादी लेखिका प्रभा श्यामराव कंटक यांचा जन्म. 'काम आणि कामिनी','अग्नियान' या कादंबऱ्या. 'भ्रांतजीवन' हा नाटिकांचा संग्रह', 'हिंदी स्त्रियांचे जीवन','महाभारत-एक मुक्त चिंतन' या पुस्तकांसह 'सत्याग्रही महाराष्ट्र' या ग्रंथातून म. गांधीजीच्या चळवळीचा इतिहास चितारलाय. **१९०९:-** लेखक पत्रूजी लहूजी खोब्रागडे यांचा जन्म. 'आंबेडकरांचे धार्मिक विचार' हा माहितीवजा ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. **१९१३:-**लेखक ज. गो. संत यांचा जन्म. 'असामी','जंगल','परि भाव नोहे डोंगा', 'डॉ. आंबेडकरी प्रणीत समता' अशी त्यांची साहित्य संपदा. **१९२६:-**लेखक, पत्रद्वारे 'दासबोध अभ्यास' या उपक्रमाचे संचालेक द्वारकानाथ वासुदेव केळकर यांचा जन्म. ह्यांची 'अर्वाचीन भारतीय शास्त्रज्ञ','अंतर्ज्ञान चक्षू','सहज बनवता येणारी शास्त्रीय उपकरणे','शिशुवीर प्राविण्य पदके','शास्त्रीय उपकरणे व प्रयोग भाग १ ते ३' तसेच लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या चरित्रासह दासबोध, रामदास स्वामी यांच्यावरही त्यांनी पुस्तके लिहिली आहेत. **१९२७:-**लेखक, पत्रकार दिनकर घनश्याम दातार यांचा जन्म. 'एकात्म मानववाद' हा ग्रंथ दीनदयाळ उपाध्याय यांच्यावर तर 'प्रेरणा' हा काव्यसंग्रह, 'राष्ट्र जिज्ञासा' या ग्रंथातून राष्ट्र व राष्ट्रीयत्व' यांची मीमांसा आणि स्वत:चे आत्मचरित्रही त्यांनी लिहिली आहे. **१९२७:-** आकाशवाणी, दूरदर्शनसाठी नाट्यलेखन करणाऱ्या उषा खाडीलकर यांचा जन्म. 'कविता काजळलेली', 'उपाशी उन्माद' ह्या दोन कादंबऱ्यांचे एकत्र लेखन केले तसेच 'छुम छुम गाणी', 'फुगेवाला', 'बोबडगीते','माणिक मोती' ही बालगीते. 'फुलोरा भाव फुलांचा' ही कथा, 'सौभाग्यकांक्षिणी' ही एकांकिका, 'सुधारणेच्या भोवऱ्यात','ही नव्हे ती' ह्या एकांकिका अशी साहित्य संपदा. **१९२९:-** 'मराठी विश्वकोश','श्रीराम विश्वकोश','विविध नियतकालिकांतून लेखन करणारे आणि 'पुरुषार्थ' मासिकाचे मानसेवी संपादक चंद्रहास पा. जोशी यांचा जन्म. **१९३०:-**लेखक आणि व्यवसायातील एक तज्ञ गोविंद सीताराम गोखले यांचा जन्म. 'ज्ञानसागरातील शिंपले भाग १ ते ५' या ग्रंथासह गोंदवलेकर महाराजांची प्रवचने हिंदी, गुजराथी, कानडीतून भाषांतरीत केली. **१९३२:-** नियतकालिकातून लेखन करणारे प्रा. डॉ. मधुकर विश्वास कुलकर्णी यांचा जन्म. 'बेलपत्र व इतर कथा' हे पुस्तक त्यांचे प्रकाशित झाले आहे. **१९३३:-** लेखक नारायण विश्वनाथ ढाकुलकर यांचा जन्म. 'अशी मजा अशी सजा', 'इथे चोराचिये नगरी' मिळून सात एक नाटिका, 'कल्पग्रंथाची किमया','मित्र नसावा ऐसा गुंडा' ह्या कुमारांसाठी कादंबऱ्या अशी साहित्य संपदा. **१९३३:-**लेखक वामनराव गजभिये तथा 'गजेंद्र यांचा जन्म. 'बौध्द विवाह पध्दती' ह्या माहितीपर ग्रंथासह काही संपादित साहित्य त्यांच्या नावावर आहे. **१९३४:-** लेखक भाई एस. जी. गुरव यांचा जन्म. त्यांच्या साहित्य संपदेत 'पास्ट टेन्स' हे वैचारिक लेखसंग्रहाचे पुस्तक तसेच 'मला भावलेला भारतीय शे. का. पक्ष','दक्षिण भारत सफर' हे प्रवासवर्णनात्मक पुस्तकासह त्यांनी स्वत:चे आत्मचरित्रही लिहिले आहे. **१९३८ :-** नामांकित वकील, ख्यातनाम वक्ते, विविध भाषा आणि वऱ्हाडचे नबाब या नावाने ओळखले जाणारे श्री.ष्ण उर्फ दादासाहेब खों यांचे निधन. 'उपासनी वाकसुधा' हे पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **१९३९:-** लेखिका पुष्पलता पाटील यांचा जन्म. बिहारचे राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांच्या त्या पत्नी. सामाजिक कार्याबरोबर लेखनाची आवड असणाऱ्या पुष्पाताईंचा 'हास्यात रंगल्या आठवणी व कथा पुष्पांजली' हे कथासंग्रह प्रसिध्द झाले. 'कथा पुष्पांजली' चे हिंदी, इंग्रजी, बंगाली भाषेत अनुवाद झालेत. त्यास आसाम सरकारचा पुरस्कार मिळाला. **१९४७:-** कादंबरीकार, नाटककार, चरित्रकार, अनुवादक, ज्योतिषशास्त्र, योगविद्या, आरोग्य, पाकशास्त्र, भारतीय राजकारण अशा वेगवेगळ्या विषयांवरील ग्रंथकर्ते लक्ष्मण नारायण जोशी यांचे निधन. 'शिवछत्रपतींचा अस्त व संभाजीचे राज्यारोहण', 'मराठेशाहीची ढाल', 'विजयी तलवार' मिळून १२ ऐतिहासिक कांदबऱ्या, तसेच नटसम्राट गणपतराव जोशी, संत तुकाराम, महाराणा प्रताप यांची चरित्र याशिवाय संगीत दामाजी, पाटीलबोवा अर्थात महादजी शिंदे या ऐतिहासिक व काही अनुवादीत नाटके त्यांच्या नावावर जमा आहेत. **१९४७:-** लेखक डॉ. सुखदेव व्यंकटराव ढाणके यांचा जन्म. त्यांच्या साहित्य संपदेत 'व्यथाफुली', 'रक्तसेतू' हे काव्यसंग्रह आणि 'चेंडा' ही कादंबरी अशी ग्रंथसंपदा. **१९४९:-** साहित्यिक 'लांजे' हिरामण तुळशीराम 'रामानंद' यांचा जन्म. 'गावाकडची गाणी','आत्मभान','अभिप्राय','हिरवा पदर' हे काव्यसंग्रह, 'वैनेचे वारे' हा लेखसंग्रह तसेच 'मराठी रंगभुमी - उगम आणि विकास, 'समग्र झाडीपट्टी' हा झाडीप्रदेशाचा संदर्भ ग्रंथ अशी ग्रंथ संपदा. **१९५०:-** विविध नियतकालिकांतून माहितीपर लेख लिहिणारे लेखक जोगेश्वरचंद्र मारोती कोरेकर यांचा जन्म. **१९५१:-**कवी शंकर दगडूजी जवदे यांचा जन्म. 'माय' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला आहे. **२०१६:-** संशोधक समीक्षक रामचंद्र चिंतामण ढेरे यांचा जन्म. बालगृह: एक दैवशास्त्रीय अभ्यास हा शोध प्रकल्प.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

निवडक

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**मुरुड जंजिरा :** अदानी फाऊंडेशन दिघी पोर्ट लिमिटेडच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ आयोजित केला होता.अब्दुल सत्तार इस्माईल अंतुले हायस्कूल दिघी येथे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला शाळेचे सभापती अनंत मेंदडकर, सलील अंतुले, मुख्याध्यापक उत्तम वाणी, सचिन मापुस्कर, सरपंच प्रमिला मेंदडकर, दिघी पोर्ट लिमिटेडचे कर्नल चंदर देव संब्याल, कॅप्टन राघवेंद्र राघव मरीन हेड, जयश्री काळे आणि शिक्षकवृंद उपस्थित होते.

### प्राणप्रतिष्ठापना संपन्न

**नागोठणे :** पडम गावातील जागृत देवस्थान श्री जाखमाता देवी मंदिराचा जीर्णोद्धार, कलशारोहण व देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना सोहळा धार्मिक कार्यक्रमांनी संपन्न झाला. श्री जाखमाता देवी मंदिराच्या दोन दिवस चालणाऱ्या या जीर्णोद्धार सोहळ्याची सुरुवात शनिवारी (दि.२९)सकाळी दहा वाजता देवीची नगर प्रदक्षिणा या धार्मिक सोहळ्याने झाली.त्यानंतर दिवसभरात पुण्यवाचन, मूर्तीला स्नान, धान्य अधिवास, गावकीचे जागरण हे धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले.

### शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ

**कोर्लई :** मुरुडमध्ये आतापर्यंत एकुण ६१७ मि.मि.पावसाची नोंद झाली आहे.पुढील ३-४ तासांत ठाणे, रायगड, पालघर आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याचा इशारा आयएमडीने देण्यात आला होता. पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाल्याचे चित्र दिसून येत आहे. मान्सून सक्रिय झाला असून पावसाने दमदार हजेरी लावली असली तरी उन पावसाच्या लहरीपणामुळे अक्षरशः जीवाची घालमेल होते आहे.

### कायद्याविषयी मार्गदर्शन

**उरण :** देशात नवीन फौजदारी कायदा अस्तित्वात येणार असून या नवीन फौजदारी कायद्याची जनतेला ओळख व्हावी, नवीन कायद्या विषयी जनतेत जनजागृती व्हावी या अनुषंगाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत न्हावा शेवा पोलीस ठाणे आणि आम्ही उलवेकर मित्र मंडळ व महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सचिन राजे येरुणकर यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कायदे लागू होणार आहेत, त्या बद्दल न्हावा शेवा बंदरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंजुमन बागवान यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### कंटेनर कलंडला


**उरण :** जेएनपीए बंदराच्या दिशेला जाणारा गंधक असलेला कंटेनर पीयुबी येथील उड्डाणपूलाखाली कलंडला होता. अग्निशमन दल आणि पोलिसांच्या सहाय्याने कंटेनर हलविण्याचे काम तातडीने करण्यात आले आहे. हा कंटेनर रस्त्यात उलटल्यानंतर शेजारून जाणाऱ्या वाहनांवर कोसळण्याची शक्यता होती. मात्र वाहन चालकाच्या प्रसंगावधानामुळे ही दुर्घटना टळली. कंटेनर उलटल्याने बंदरात जाणाऱ्या वाहतुकीवर परिणाम झाला होता.

## उरण पूर्व विभागातील
# वीज समस्या लवकरच सुटणार
### दिघोडे येथे सबस्टेशनसाठी महावितरणकडे जागा हस्तांतरित

**। उरण। दिनेश पवार ।**

महावितरणच्या दुर्लक्षामुळे उरणच्या पूर्व विभागात विजेचा सातत्याने खेळ खंडोबा सुरू असतो. रात्री अपरात्री, कधी कधी दिवसभर या भागात वीज खंडीत होते त्यामुळे नागरीकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. या त्रासातून आत्ता पुर्व भागातील जनतेची सुटका होणार आहे. दिघोडे येथे नवीन सवस्टेशन होणार असून या करता शासनातर्फे जागा महावितरणला भाडेपट्टीने देण्यात आली असून त्या बाबतचे डिपॉझिट शासनाकडे महावितरणने नुकतेच भरण्यात आले आहे.

केंद्र शासन पुरस्कृत आरडीएसएस योजनेअंतर्गत प्रस्तावित असलेल्या नवीन उपकेंद्र उभारण्याकरीता दिघोडे येथिल स.न. १६६/६क या शासकीय जमिनीपैकी १० गुंठे जमिन हस्तांतरीत करण्यात आली आहे. त्यामुळे लवकरच येथे महावितरणकडून वीज केंद्राचे काम सुरू होवून उरण पूर्व भागातील विजेची समस्या दुर होईल. दिघोडे येथे उपकेंद्र होण्यासाठी माजी जि.प. सदस्य वैजनाथ ठाकूर यांनी कित्येक वर्षे पाठपुरावा केला होता त्यांच्यामुळेच हे उपकेंद्र मंजूर होण्यापासून ते जागा मिळणे या बाबी मार्गी लागल्या आहेत.



उरण तालुक्यातील पूर्व भाग विकसित होत चालला आहे विविध कंपन्याची गोदामे वसली आहेत. विजेचा वापरात ही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. विजेचा वापर वाढत असताना मात्र सर्व सामान्य जनतेची दररोजची वीज गायब होऊ लागली आहे

कोणत्याना कोणत्या भागामध्ये विजेचे फॉल्ट असल्याचे कारण पुढे करत वीज गायब होते. पावसाळा सुरू झाल्यापासून हा नित्य नियम सुरू आहे. सकाळ, दुपार, संध्याकाळ असे तिन्ही वेळेत वीज गायब होते आहे. याचा अर्थ अधिकार्यांचे विजेच्या मेंटनन्सकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसुन येत आहे.

याचा सर्वाधिक फटका उरण तालुक्याच्या पूर्व विभागाला बसत आहे. उरण पूर्व भागात येणारी वीज ही सुमार ७० ते ७५ किलोमिटर लांबीवर असलेल्या फिडरवरून आणली जाते त्यात ही संपूर्ण वीज लाईन ही रस्त्यांच्या कडेकडेने आलेली आहे. या रस्त्यांवर सध्या प्रचंड मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढली असल्यामुळे रोज कुठेतरी एकतरी वाहन या विजेच्या खांबाना धडकल्यामुळे वीज खंडीत होते. त्याच प्रमाणे उरण पुर्व भागात या वीजवाहिन्यांच्या खाली सर्वत्र भराव झाल्यामुळे वीज वाहिन्या जमिनी लगत खाली आल्या आहेत. एखादे वाहन किंवा काहीतरी

> उरण पुर्व भागासाठी दिघोडे येथे १० गुंठे जागा मिळाली असून त्याचे शासनाकडे डिपॉझिट भरले आहे. लवकर या कामाचे टेंडर होवून सबस्टेशनच्या कामाला सुरूवात करण्यात येणार आहे.
>
> – विजय सोनावणे,
> अति. कार्यकारी अभियंता
> महावितरण उरण

अपघात होऊन या वीज वाहिन्या तुटल्या जातात. त्यामुळे वीज पुरवठा खंडीत होतो.

उरण तालुक्यातील मागील दोन वर्षात विजेचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. प्रचंड प्रमाणे वाढणारे औद्योगीकरण व शहरी करण यामुळे विजेची मागणी वाढली आहे. तालुक्यात सुमारे ७००ते ८०० हे व्यावसायिक प्रकारचे ग्राहक आहेत. तालुक्यात सुमारे ५०० च्या जवळपास ट्रान्सफॉर्मर आहेत . उरण पूर्व विभागात सुमारे ७०ते ७५ किलोमीटर लांबून वीज आणावी लागते. त्यामुळे इथंपर्यंत येताना वीज वाहिनीमध्ये काहीतरी समस्या येऊन रोज वीज खंडीत होते. यासाठी हे अंतर कमी करणे गरजेचे आहे. यासाठी उरण पूर्व भागात सबस्टेशन आणि फिडर उभारणे गरजेचे होते.

# भात लावणीसाठी मजूर मिळेनात
### हंदा पद्धत लुप्त झाल्याने शेतकरी चिंतेत

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

औद्योगिक विकासामुळे उरण तालुक्यातील शेती क्षेत्र दिवसागणिक कमी होत आहे. एकेकाळी भाताचे कोठार म्हणून उरण तालुक्याची ओळख होती.मात्र आजच्या घडीला या शेतीप्रधान तालुक्यात शेती कामासाठी लागणारे मजूर मिळणं दुरापास्त झाले आहे. त्यामुळे, कोणी मजूर देता का? मजूर म्हणत गावोगावी शेतीमालकांवर भटकण्याची वेळ आली आहे.विशेष म्हणजे यामुळे इतरांची शेतजमीन तीन हिस्से देऊन देखील कोणी कसायला घेत नसल्याचे चित्र येथे दिसून येत आहे.

सध्या उरण तालुक्यात शेतीच्या कामांची लगबग सुरू आहे.शेतीच्या कामासाठी वेगवेगळी अत्याधुनिक यंत्र सामग्री आली आहे. मात्र शेत मजुरांचीच गरज ही लागतेच. परंतु शेतीच्या कामांसाठी उरण तालुक्यात मजूर मिळत नसल्याने शेती ओसाड ठेवण्याची शेतकऱ्यांवर वेळ आली आहे. सध्या उरण तालुक्यात मोठया प्रमाणावर गोदामे निर्माण झाली आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांना रोजगार मिळत आहे. पूर्वी रोजगारांची साधने कमी असल्याने सहज मजूर उपलब्ध



> अवजारे, महागडी बियाणे मजुरांचा तुटवडा, वाढती मजुरी, महागाई यामुळे शेतकरी मेटाकुटीला आले आहेत. वाढत्या गोदामांचा परिणाम येथील शेतीवर झाला आहे. पूर्वी जे शेतकरी मेहनत करत होते, ती मेहनत आता दिसून येत नाही.
>
> – विजय पाटील, चिरनेर
> शेतकरी

होत असत. दिवसभर उन्हा पावसात मेहनतीची कामे कशाला करायची? म्हणून मजूर शेतीच्या कामाला नकार देत आहेत. मजुरांअभावी शेतकरी हतबल झाले आहेत.

दिवसेंदिवस महागाईत वाढ होत असून उपलब्ध मजुरांनी त्यांच्या मजुरीचे दर वाढविले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करणे फार अवघड होऊन बसले आहे.

तालुक्यात पेरणीची लगबग सुरू असून, पेरणी झाल्यानंतर भात लावणी करिता मोठ्या प्रमाणात मजुरांची गरज भासते. ३०० ते ४०० रुपये मजुरी मजुरांना रोख मोजावी लागते. याशिवाय सकाळचा चहा नाष्टा, दुपारचे मासळी, मटन-चिकनचे जेवण, शाकाहाराचा वार असल्यास दोन-तीन भाज्या पापड लोणचे वरण भात भाकरी अशा जेवणाची मजुरांना व्यवस्था करावी लागते. त्यामुळे आता शेती करणे शेतकऱ्यांना कठीण होऊन बसले आहे.

# एसटीतील दहा कर्मचारी सेवानिवृत्त

**। हमरापूर । वार्ताहर ।**

पेण-रामवाडी येथील एसटी महामंडळाच्या रायगड विभागीय कार्यशाळेतील कर्मचारी अनिल दरेकर यांच्यासह दहा जण सेवा निवृत्त झाले.

रामवाडी येथील विभागीय कार्यालयात यनिमित्त निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास विभाग नियंत्रक दीपक घोडे, एसटीचे अधिकारी कांबळे, विलास खोपडे, विजय केळकर, जी.एम. पाटील, निवृत्त कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

एसटीतील आपल्या ३८ वर्षाचा सेवेनंतर अनिल दरेकर विभागीय कार्यशाळा पेण, मुस्ताक तांडेल, हनुमंत मोहिते, कुमार बापट, अलिबाग, अब्दुल करीम खतीब, रोहा, जयप्रकाश म्हात्रे, अलिबाग, प्रसन्न पाटील, अलिबाग, संदीप पाटील, अलिबाग हे आज सेवानिवृत्त झाले.

यावेळी आयोजित कार्यक्रमात बोलताना कृष्णकांत दरेकर यांनी आज हे सर्व कर्मचारी आपल्या नोकरीच्या कालावधी पूर्ण करून सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे भविष्यात त्यांना व इतर सर्वांना पुढील वाटचालीसाठी सुयश चिंतले. रामवाडी विभाग नियंत्रक दीपक घोडे यांनी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कामकाजाच्या पद्धतीचा नीटनेटकेपणा उपस्थित असणाऱ्या मान्यवरांसमोर मांडला. आज जे सेवा निवृत्त होतं त्या सर्वांनी एसटीमध्ये चांगले काम केले त्या सर्वांची उणीव नक्की जाणवेल. एस.टी.महामंडळाच्या योजनाबद्दल देखिल यावेळी विभाग नियंत्रक दीपक घोडे यांनी सविस्तर माहिती उपस्थितांना सांगितली.

# उरण युनिटची नवीन कार्यकारिणी जाहीर

**। उरण । वार्ताहर ।**

म्युनिसिपल एम्प्लाईज युनियनच्या उरण नगरपरीषद उरण युनिटचे अध्यक्ष रमेश कांबळे हे तब्बल १५ वर्ष अध्यक्ष होते. ते ३१ में २०२४ रोजी निवृत्त झाले.

या अनुषंगाने गुरुवारी (दि. २७) संघटनेच्या सर्वसाधारण सभेमध्ये पुढील कार्यकाळात संघटनेच्या अध्यक्षपदाची धूरा हरेश जाधव यांची निवड करून सर्वानुमते सोपविण्यात आली. उरण नगरपरीषदेच्या युनिटची नवीन कार्यकारिणी संघटनेचे सरचिटणीस अनिल जाधव आणि कार्याध्यक्ष संतोष पवार यांच्या उपस्थितीत



घोषित करण्यात आली. अध्यक्ष हरेश जाधव, कार्याध्यक्ष मधूकर भोईर, सचिव नरेंद्र उभारे, खजिनदार माधव सिद्धेश्वरे, उपाध्यक्ष राजेश सोलंकी, उपाध्यक्ष महेंद्र साळवी, उपाध्यक्ष धनेश कासारे यांची नेमणूक उरण नगरपरीषद कर्मचाऱ्यांनी सर्वानुमते केली.

म्युनिसिपल एम्प्लाईज युनियनचे कार्याध्यक्ष संतोष पवार आणि सरचिटणीस अनिल जाधव यांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष हरेश जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

### जलजीवन मिशन योजनेंतर्गत कर्जत तालुक्याची
# नळ पाणीपुरवठा आढावा बैठक संपन्न

**। माथेरान । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांची आढावा बैठक कर्जत येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीदरम्यान कर्जत तालुक्यातील मंजूर व प्रगतीपथावर तसेच पूर्ण झालेल्या योजनांचा आढावा घेण्यात आला.

कर्जत तालुक्यात १२३ योजना मंजूर असून २४ योजना पूर्ण व ९२ योजना प्रगतीपथावर आहेत. या बैठकीत काम करत असताना व योजना परिपूर्ण करत असताना तेथील निर्माण होणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी जिल्हा प्रमुख संतोष भोईर, तालुकाप्रमुख संभाजी जगताप, उप अभियंता मिटकरी , शाखा अभियंता सुजित धनगर, करडे व पाणीपुरवठा विभागाचे इतर अधिकारी व ठेकेदार उपस्थित होते.

कर्जत तालुक्यातील असणाऱ्या पाणी योजनाबाबत समितीने अधिकारी आणि ठेकेदार यांना योजना गुणवत्तापूर्ण करण्याबाबतच्या सूचना दिल्या. कोणत्याही योजनेबाबत तक्रार न येण्याबाबत अधिकारीवर्गाला बैठकीमध्ये सांगण्यात आले.

## नेरळ-लोभेवाडी
# रस्त्याचे काँक्रिटीकरण पूर्ण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेरळ पिंपळोली सुगवे लोभेवाडी या राज्यमार्ग रस्त्यावरील कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीमधील दोन किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात आले आहे. या रस्त्याचे काँक्रिटीकरण कामासाठी तब्बल सात कोटींचा निधी मिळाला होता.दरम्यान, अतिक्रमण दूर करून हा रस्ता बनविण्यात आला असून कोल्हारे ग्रामपंचायत मधील मुख्य रस्ता काँक्रीटचा बनल्याने येथील व्यापार उद्योग वाढण्यास मदत होणार आहे.

माथेरान नेरळ कळंब या राज्यमार्ग रस्त्यावरून साई मंदिर कोल्हारे येथून नेरळ, पिंपळोली, तळवडे, सुगवे लोभेवाडी असा राज्यमार्ग रस्ता जातो. या रस्त्यावरील साईमंदिर पासून कोल्हारे आदिवासी वाडी पर्यंतचा रस्ता सिमेंट काँक्रीटचा बनविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने निधी मंजूर केला होता. साई मंदिर पासून बोपेले गाव आणि पुढे कोल्हारे आदिवासी वाडी या भागातील रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात आले असून या दोन किलोमीटर अंतरावरील रस्त्यात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होते.त्यात दोन ठिकाणी स्वागत कमानी होत्या. तसेच अनेक ठिकाणी रस्त्याच्या जवळ होती. ती सर्व अतिक्रमणे दूर व्हावीत यासाठी सामूहिक प्रयत्न झाले आणि त्यानंतर कोल्हारे ग्राम पंचायत मधील हा महत्वाचा रस्ता सार्वजनिक बांधकाम खात्याला अगदी वेळेत पूर्ण करता आला आहे.

# फुंडे ग्रामपंचायतीला आय.एस.ओ.नामांकन प्रदान

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील फुंडे ग्रामपंचायतीला आय.ए.एस. कमिटी कडून एस.आरसर्टीफिकेट संस्थेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे आय.एस.ओ. ९००१: २०१५ हे नामांकन सर्टिफिकेट संस्थेचे लिड ऑडिटर किरण भगत व गटविकास अधिकारी समिर वाठारकर यांच्या हस्ते गटविकास अधिकारी,पंचायत समिती उरण यांच्या दालनात प्रदान करण्यात आले.या नामांकन सर्टिफिकेटचे मानकरी ठरलेल्या फुंडे ग्रामपंचायतीचे तालुक्यातून सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

या नामांकन प्राप्तीसाठी ग्रामपंचायत कार्यालयाची कामकाज पद्धत, स्वच्छता, नागरिकांना मिळणारी वागणूक,ग्रामस्थांना





पुरविण्यात येणाऱ्या सुविधा, निटनेटकी इमारत,आदी निकषानुसार हे नामांकन देण्यात येते.त्यामुळे फुंडे ग्रामपंचायतीने वरील निकष पाळण्यासाठी अधिक मेहेनत घेतल्याने हे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नामांकानाची मानकरी ठरली आहे. उरण तालुक्यात एकूण ३५ ग्रामपंचायती असून फुंडे ग्रामपंचायतीने हे यश संपादन केले आहे.

तर उरण पंचायत समितीचे विस्तार अधिकारी विनोद मिंडे व लिड ऑडिटर किरण भगत यांचे विशेष मार्गदर्शन कामी आले असल्याचे ग्रामविकास अधिकारी राजेंद्र सातंगे यांनी नमूद केले.हे नामांकन स्विकारतांना उरण पंचायत समिती येथे फुंडे ग्रामपंचायतीचे सरपंच सागर घरत, उपसरपंच चंद्रकांत म्हात्रे, वरिष्ठ सहाय्यक युवराज पाटील, ग्रामपंचायत सदस्या रुचिता म्हात्रे , कविता म्हात्रे, जुईली घरत, हर्षा घरत, ग्रामस्थ प्रितम म्हात्रे, ग्रामपंचायत कर्मचारी अरुणा म्हात्रे, दिपाली कडू, विलास भोईर आदी उपस्थित होते.

# सुट्टीच्या दिवशीही वीजबिल भरणा केंद्र सुरू

**। कल्याण । वार्ताहर ।**

ग्राहकांना वीजबिलाचा भरणा करणे अधिक सुलभ व्हावे, यासाठी सुट्टीच्या दिवशीही वीजबिल भरणा केंद्र सुरु राहणार आहेत. त्यानुसार कल्याण परिमंडलांतर्गत सर्व अधिकृत वीजबिल भरणा केंद्र सुट्टीच्या दिवशी सुरु राहतील. उपलब्ध सुविधेचा लाभ घेऊन वीज ग्राहकांनी आपल्या चालू वीजबिलासह थकबाकीचा भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांनी केले आहे.

सुट्टीच्या दिवशीही ही मोहीम सुरू राहणार असून संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी थकबाकीचा त्वरित भरणा करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. अधिकृत वीजबिल भरणा केंद्रासह महावितरणचे मोबाईल ॲप संकेतस्थळ तसेच विविध पेमेंट वॉलेटचा उपयोग करून घरबसल्या विजबिलाचा ऑनलाईन भरणा करण्याची सुविधाही ग्राहकांना उपलब्ध आहे. ग्राहकांनी अखंडित वीज सेवेसाठी उपलब्ध सुविधांचा उपयोग करून चालू व थकीत वीजबिलाचा भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे. मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८
- पी.एन.पी मध्ये गाळा भाड्याने देणे आहे. साबु हॉस्पिटल बिल्डींग, कलावती भाजी भंडारच्या बाजुला संपर्क - ९६०४१३८८२६/७३०४८५२३१५
- वाडगाव फाटा येथे कॉटेजमध्ये काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. मो.९८२२९३८४४४
- अलिबाग शहरात मध्यवर्ती ठिकाणी मेडिकलसाठी ४ ते ५ वर्षे अनुभवी फार्मासिस्ट पाहिजे. ९४२११६३१२४
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३ अलिबाग

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### समुद्राचं तीर्थ होणार चंद्रभागेला समर्पित
# भरडखोल गावची वारी पंढरपूरकडे मार्गस्थ

**। बोर्ली पंचतन ।**
**। मकरंद जाधव ।**

गेली ३९ वर्षं पंढरीच्या वारीची अखंड परंपरा जपणाऱ्या श्रीवर्धन तालुक्यातील भरडखोल गावच्या कोळी बांधवांची संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींची पायी आषाढी वारी शनिवारी (दि.२९) सकाळी टाळ-मृदुंगाच्या तालावर विठू नामाच्या जयघोषात मोठ्या उत्साहात पंढरीकडे मार्गस्थ झाली.

वैशाख वणव्याची काहिली सरुन मृग नक्षत्राच्या सरी बरसू



लागल्या की वारकऱ्यांना वेध लागतात ते पांडुरंगाच्या भक्तीत चिंब भिजण्याचे. यातुनच मग अवघ्या वारकऱ्यांची पावलं पंढरीची वाट चालू लागतात. भरडखोल गावची वारीही अबालवृद्धांसह पंढरीकडे मार्गस्थ होते. वारीला जाताना आपल्यासोबत नेलेलं समुद्राचं तीर्थ चंद्रभागेमधे समर्पित करुन भरडखोल पंचक्रोशीतला प्रत्येक माऊली पांडुरंगाच्या चरणी विश्वाच्या कल्याणाचं मागणं मागत असतो.

ठिकठिकाणच्या मुक्कामावर आपापल्या परीने वारकऱ्यांची सेवा करणारे ग्रामस्थ विठू माऊलीच्या सेवेची अनुभूती घेत असतात.भरडखोल ते पंढरपूर हे ३७५ किलोमीटरचं अंतर १८ दिवस ऊन-पाऊस खाच-खळग्यांची तमा न बाळगता पायी चालत पंढरीला पोहोचलेले समस्त वारकरी विठू माऊलीचं दर्शन होताच भरून पावतात.महाराष्ट्रातून विठ्ठल नामाचा जयघोष करीत पंढरीत येणाऱ्या दिंड्यांचा चंद्रभागेच्या तिरी रंगणारा वारीचा सोहळा म्हणजे महाराष्ट्राचं गौरवशाली, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक ऐश्वर्य आहे. अशा या वारीचा जीवनात एकदा तरी अवश्य अनुभव घ्यावा.

# वसंतराव नाईक : हरित क्रांतीचे जनक

**कृषी दिन विशेष**
**रणवीर राजपूत**

अन्नदाता शेतकरी जर समृद्ध झाला, तर राज्यासह देशही सुजलाम् सुफलाम् होईल, हा संदेश देणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद तालुक्यातील गहुली येथे फुलसिंग नाईक यांच्या बंजारा समाजाच्या शेतकरी कुटुंबात झाला अन् जणू भटक्या अन् विमुक्त जातींचा कैवारी उदयास आला. वसंतरावांनी उच्चशिक्षित होऊन समाजातील गोरगरीब, निराधार, गरजू घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी आपले योगदान द्यावे, अशी वडिलांची इच्छा होती.त्याअनुषंगाने वसंतरावांनी प्रामाणिकपणे वाटचाल केली. शालेय जीवनापासूनच त्यांची बुद्धिमान विद्यार्थी म्हणून ओळख होती. पुढे त्यांनी नागपूरच्या मॉरिश कॉलेजमध्ये बी.ए. अन् नंतर एल.एल.बी. ची पदवी संपादन केली. भटक्या, विमुक्त व अन्य मागास जातींच्या घटकांना न्याय मिळावा, त्यांना त्यांचे न्याय्य हक्क मिळावेत, या प्रांजळ उद्देशाने त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू करून गरजूंना न्यायालयीन कामकाजात मोफत सेवा प्रदान केली. परंतु, केवळ वकिली करून दीनदुबळ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत, हे लक्षात आल्यावर त्यांनी समाजकारणासाठी राजकारणात पदार्पण केलं.

प्रारंभी वसंतराव हे १९६४ मध्ये पुसद नगरपालिकेचे नगराध्यक्ष झाले अन् तेथूनच त्यांच्या राजकीय जीवनास सुरुवात झाली. नंतर त्यांनी पुसद तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्षपद भूषविले. विशेष म्हणजे, १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत विधानसभेवर निवडून आल्यावर ते जुन्या मध्यप्रदेशाच्या मंत्रिमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री झाले. सन १९५६ मध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या द्विभाषिक मंत्रिमंडळात त्यांनी सहकार मंत्री तर, १९५९ साली कृषीमंत्री म्हणून आपल्या कार्याचा ठसा उमटविला. महत्त्वाचे म्हणजे १ मे १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यावर राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी महसूल मंत्र्याची धुरा सांभाळली. अशाप्रकारे राजकीय क्षेत्रात त्यांनी चढत्या क्रमाने यशस्वी घोडदौड केली. इतकेच नव्हे तर, नाईकसाहेबांनी पुढे सलग १२ वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून उल्लेखनीय कार्य करून राज्याच्या राजकारणात त्यांची अजातशत्रू व वादातीत राज्यकर्ते म्हणून ओळख झाली. नाईकसाहेबांना आपल्या कार्यकाळात सर्वसामान्य लोकांचे प्रश्न सोडविताना अग्नीदिव्यातून जावे लागले होते. कारण, त्यांच्या कार्यकाळात दोन युद्धे आणि तीन दुष्काळांना सामोरे जावे लागले. तरी, अशा प्रतिकूल परिस्थितीतही शिवरायांचा महाराष्ट्र हा ताट मानेने उभा राहिला. कोणापुढे झुकला नाही. राज्याचा सर्वांगीण विकास साधताना, भटक्या व विमुक्त जातींतल्या लोकांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकासासाठीही त्यांनी मोठं योगदान दिलं.

या पार्श्वभूमीवरच भटक्या-विमुक्त जनजातींचे लोक वसंतराव नाईक यांना आपलं दैवत मानतात.

दर्जेदार कृषी उत्पादनाच्या वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असा शेतकऱ्यांना संदेश देऊन नाईकसाहेबांनी हरित क्रांतीच्या दिशेने वाटचाल केली. १९७२ च्या भीषण दुष्काळाने साऱ्या राज्यात कहर केल्याने शेतकरी, शेतमजूर, कामगार व हाता-पोटावर जीवन जगणाऱ्या कष्टकरी लोकांचा उदरनिर्वाह करण्याचा प्रश्न अतिशय जटिल झाला होता. या बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी वसंतरावांनी रोजगार हमी योजनेची संकल्पना मांडली. या योजनेंतर्गत शेती व शेतीपूरक कामे मिळत गेल्याने सामान्य लोकांना मोठा दिलासा मिळाला. ही अभिनव योजना राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचा मान मिळाला. तत्कालिन पंतप्रधान इंदिराजी गांधी यांनी या योजनेची मुक्तकंठाने प्रशंसा करून मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचं त्यांनी अभिनंदन केलं. वास्तविक पाहता, वसंतरावांनी राज्यातील शेतकरी, कष्टकरी कामगार, शेतमजूर यांना संकटकाळातही ताट मानेनं जगण्याची शिकवण दिली. 'मोडेल पण वाकणार नाही' हा बाणा त्यांनी राज्य प्रमुख म्हणून स्वतःही जपला व लोकांनाही जपण्यास प्रवृत्त केलं.राजकारणातून समाजकारण कसं करावं, हा बाळकडू नाईकसाहेबांनी राज्यकर्त्यांना दिला. वसंतराव नाईक यांनी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली, याबद्दल राज्य सरकारने त्यांचा १ जुलै हा जन्म दिवस राज्यात 'कृषी दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.



नाईकसाहेबांनी अवर्षण काळात राज्यातील लोकांना पाण्याचे महत्व व उपयुक्तता काय याची शिकवण दिली. घरा-घरांच्या अवतीभोवती प्रत्येकाने एक-एक झाड लावावे अन् त्याची मशागत करावी. शेतांच्या बांधांवर वृक्षारोपण करून शेतकऱ्यांनी महाराष्ट्राच्या जमिनीच्या कणाकणात समृद्धी फुलवावी, तसेच नद्या नाल्याचे पाणी अडवा व ते जमिनीत जिरवा. तसे न जमल्यास, घागरीने पाणी आणून आपल्या जमिनी ओल्या करा, असा संदेश त्यांनी बळीराजाला दिला. नदी नाल्यांवर बंधारे बांधण्याची त्यांनी योजना आखली. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या दृष्टीने उपयुक्त असणाऱ्या, 'वसंत बंधारे' उभारण्यास पुढच्या काळात शेतकऱ्यांनी पसंदी दर्शविली. पर्यावरणाचे रक्षण अन् संवर्धन करणारे नाईकसाहेब हे खऱ्या अर्थानं पर्यावरणप्रेमी होते, हे निष्पन्न होते. नाईकसाहेबांच्या मते, आजचा शेतकरी हा उद्याचा कारखानदार व्हावयास पाहिजे. या पार्श्वभूमीवर त्यांनी राज्यात साखर कारखाने, सुत गिरण्या, कुक्कुटपालन पशुपालन, दुग्धव्यवसाय सुरू करण्यास चालना दिली. वास्तवात त्यांनी शेतकऱ्यांना उद्यमशील होण्याचा महामार्ग दाखविला. यावरून नाईकसाहेब हे शेतकऱ्यांचे हितचिंतक होते, हे दृष्टोत्पत्तीस येते.

मराठी ही राज्यातील लोकांची बोली भाषा असल्याने, नाईकसाहेबांनी आपल्या कार्यकाळात प्राधान्याने तिला राजभाषेचा दर्जा देण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यामुळे राज्यातील सर्वसामान्य लोकांना शासकीय कामकाजातील नियम, कायदे समजणे आणि सरकारी कर्मचाऱ्यांशी समन्वय अन् संवाद साधणे सुकर झाले आहे. सरकारी कामकाजात मराठी भाषेचा वापर अनिवार्य झाल्याने शासनस्तरावर जनतेचे जिव्हाळ्याचे प्रश्न तथा कामे यांचा निपटारा जलदगतीने होऊ लागला आहे.

मराठी राजभाषेला लोकाभिमुख करण्याचे सर्वस्वी श्रेय नाईकसाहेबांना जाते. याबद्दल राज्यातील मराठी माणूस हा नाईकसाहेबांचा ऋणी आहे. चला तर, आपण सर्वजण लोकसहभागातून राज्यात पुनश्च 'हरित क्रांती' निर्माण करण्यास सरकारला हातभार लावूया अन् लोकनेते वसंतराव नाईक यांचे स्वप्न साकार करूया! **

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

# नांदगाव विद्यालयात शैक्षणिक साहित्य वाटप

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे सुमेध खैरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शुक्रवारी (दि. २८) विद्यार्थ्यांना वह्या, दप्तर, पेन, चप्पल, मानव विकास अंतर्गत सायकल, गणवेश या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना सुरेश खैरे म्हणाले की, सुरुवातीला हे विद्यालय पोल्ट्रीच्या इमारतीमध्ये अल्प विद्यार्थ्यांवर पंचक्रोशीतील नागरिकांच्या सहकार्याने सुरू केले. आज ही शाळा आयएसओ मानांकन प्राप्त, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला, तसेच या शाळेचा दहावी आणि बारावीचा निकाल तालुक्यात अव्वल आहे. या शाळेच्या प्रगतीमध्ये माजी विद्यार्थी, शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे आहे.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अतुल म्हात्रे यांनी सांगितले की, माझीदेखील शैक्षणिक सुरुवात एका ग्रामीण भागातील शाळेतून झाली. मलादेखील उच्च शिक्षणासाठी पनवेल, मुंबई, परदेशात लंडन येथे जाऊन मास्टर ऑफ आर्किटेक्ट पदवी घ्यावी लागली. यासाठी मला खूप मेहनत घ्यावी लागली. आपल्याला जर यश संपादन करायचे असेल, तर मेहनत करा अशक्य असे काहीच नाही.




दरम्यान, यावेळी महाबँक सेवानिवृत्त परिवाराकडून दप्तर, गणवेश, वह्या, कंपास, कपाट, सुशील चोरघे माजी विद्यार्थी यांच्याकडून १०० विद्यार्थ्यांसाठी चप्पल जोड, माजी विद्यार्थी एकनाथ हळदे यांच्याकडून २०० पेन, आनंद वाचन चळवळ पुणे शालेय वाचनालयासाठी १०० पुस्तके भेट देण्यात आली.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Re-E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000031369**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-5/ 2024-2025.**<br>RFx E-tender for Hiring of LMV vehicle for EHV lines Sub-Division Panvel-2 under EHV (O&M) Division Panvel for period 01.07.2024 to 31.03.2025...5th **call.**<br>**Tender amount Rs. 4,49,946/-,**<br>**EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **28.06.2024, 18:00 Hrs. to 07.07.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 07.07.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **08.07.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**




# व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा उत्साहात

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा उत्साहात संपन्न करण्यात आली.

रायगड जिल्ह्याचा शैक्षणिक विकास हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून साई फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व नाईटिंगल चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्या विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. डायरेक्टर निखिल दुधे यांच्या प्रमुख उपस्थितीत व साई फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेस अमित चौधरी, संदीप विचारे, अश्विनी विचारे, संदेश गमरे, विनोद पाटील, तौसिफ येरूणकर, मुख्याध्यापक दिपक जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

याकार्यशाळेतलालालजपतराय इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मुंबईचे प्रो.डॉ. गौतम त्रेहन व प्रो. कविता पाटील या तज्ज्ञ मार्गदर्शकांनी उपस्थित शिक्षकांना व्यक्तिमत्त्व विकास याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना अधिक विकसित करून व त्यांच्यातील गुणवत्तावाढीसाठी सदर उपक्रमाचे उद्दिष्ट असून, या उपक्रमाची सुरूवात ही शिक्षकांना प्रशिक्षण देऊन व त्यांना अधिकाधिक विकसित करण्याच्या ध्येय धोरणानुसार या उपक्रमाची सुरूवात ही शिक्षकवर्गाला प्रशिक्षण देऊन करण्यात आली असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

## मुरूडमध्ये मनस्वी वाडकरचा सत्कार

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील माऊंट कार्मेल हायस्कूलमधील इयत्ता दहावीतील विद्यार्थी व विद्यार्थिनी धव्वल यश प्राप्त केले होते. या शाळेतील विद्यार्थिनी मनस्वी वाडकर हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेत ८१ टक्के गुण मिळवून या विद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. याबद्दल मजगाव येथील अंजुमन वसीऊल तलीम एज्युकेशनल ट्रस्ट रायगड, मेहरुणीसा अब्बास फकिह इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. या संस्थेचे निदेशक एजाज दळवी यांच्या हस्ते मनस्वी वाडकर हिला मेडल, सन्मानचिन्ह, व प्रशस्ती पत्रक देऊन गौरविण्यात आले. यावेळी या शाळेचे वरिष्ठ शिक्षक सुरेश वेगस, राजेंद्र घोसाळकर, रोशन मार्टिस, शुभांगी पंछी आदी मान्यवर उपस्थित होते.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स**



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# अवैध पार्किंगसंदर्भात पोलिसांच्या सूचना

**। पनवेल । वार्ताहर ।**

आशिया खंडातील सर्वात मोठे स्टील मार्केट म्हणून कळंबोली स्टील मार्केटची ओळख आहे. मात्र, याच परिसरात होत असलेल्या अवजड वाहनांच्या अवैध पार्किंगमुळे मोठी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. या अनुषंगाने नवी मुंबई वाहतूक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या आदेशानुसार कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिभाऊ बानकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पांडुरंग साठे यांनी बिमा कॉम्प्लेक्स, स्टील मार्केट येथे स्टील मार्केटमधील ट्रक, कंटेनर, ट्रेलर, मिक्सर आदि अवजड वाहनचालकांची बैठक घेतली. यावेळी स्टील मार्केटमधील पार्किंगच्या गंभीर समस्येबाबत वाहनचालकांना सूचना देण्यात आल्या.

तळोजा, मुंब्रा, शीळफाटा, कल्याण, भिवंडी, बदलापूर परिसरात जाण्यासाठी पनवेलहून कळंबोली सर्कल येथून जाणे सोयीचे ठरते. कळंबोली सर्कल येथील वाहतूक कोंडीतून वाट काढण्यासाठी वाहनचालक स्टील मार्केटमधील सर्विस रोडचा मार्ग अवलंबतात. मात्र, स्टील मार्केटमधील रस्त्यावर होणार्या दुहेरी, तिहेरी अवैध पार्किंगमुळे वाहनचालकांच्या मोठ्या रांगा लागतात आणि परिणामी कळंबोली सर्कलच्या वाहतूक कोंडीवर आणखीनच भर पडते. या धर्तीवर वाहन पार्किंग करताना एकेरी पार्किंगव्यतिरिक्त कोणीही स्टील मार्केटमधील सर्विस रोड व इतरत्र रोडवर कुठेही आपली वाहने दुहेरी अथवा तिहेरी पार्किंग करणार नाहीत याबाबत कळंबोली वाहतूक पोलिसांनी वाहनचालकांना सक्त ताकीद दिली. तसेच असे करताना कोणी आढळून आल्यास सदर वाहनांवर गंभीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. तसेच सर्व वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम तंतोतंत पाळण्याबाबत प्रबोधन करण्यात आले. यावेळी वाहन चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. ३०/०६/२०२४

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- मौजे/गाव- नांदगांव, ता. मुरुड, जि. रायगड, गट क्रमांक व उपविभाग- ९१३, एकुण क्षेत्र हे. आर. ०-०६-००, आकारणी ५-१३ रु. पैसे., ही मिळकत सातबारा सदरी १) रियाज अहमद कासीम बंदरकर, रा. मु. पो. नांदगांव, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड २) अबरार नबाब मन्सुरी, रा. मु. पो. विहूर, ता. मुरुड, जि. रायगड यांचे नांवे सातबारा सदरी दाखल आहे. तसेच सदर नमुद जमिन मिळकतीवरील ग्रुप ग्रामपंचायत नांदगांव, ता. मुरुड, जि. रायगड यांचे असेसमेंट सदरी दाखल असलेली मालमत्ता क्र. १२८५ ब-३, क्षेत्र ५६-६९ चौ.मी., व मालमत्ता क्र. १२८५ क-१, क्षेत्र ५६.६९ चौ.मी., अशा दोन्हीं घर मिळकती १) रियाज अहमद कासीम बंदरकर, रा. मु. पो. नांदगांव, ता. मुरुड, जि. रायगड यांचे नांवी असेसमेंट दप्तरी दाखल आहेत.

सदर नमुद दोन्हीं घर मिळकती आमचे अशिल १) मेहबूब अब्दल्ला सिरसिकर, २) सुलताना मेहबूब सिरसिकर, ३) आलिया मेहबूब सिरसिकर, सर्व रा. मु. पो. नांदगांव, ता. मुरुड, जि. रायगड यांनी नोंदणीकृत खरेदीखताने मिळकतींचे विद्यमान मालक रियाज अहमद कासीम चंदरकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीच्या मोबदल्याची संपुर्ण रक्कम आमचे अशिलांनी मिळकतींचे विद्यमान मालक रियाज अहमद कासीम बंदरकर यांना अदा केलेली आहे व त्याचवेळी मिळकतींचा ताबा आमचे अशिलांकडे विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

या घर मिळकती निर्वेध असल्याचा निर्वाळा त्या मिळकतींच्या विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी देखील या मिळकतींमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, यक्षिस, मृत्युपत्रांकित दान, ताजा कुहियाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचिही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांत सकृतदर्शनी लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे. असे समजून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागावून येणाऱ्या हरकती आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. महेश्वरी मोहन तांबडकर**
बी. कॉम, एल.एल.बी.
रा. मु. लक्ष्मीखार मुरुड,
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड,
पिन नं. ४०२ ४०१.

**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय**
**शुक्रतारा बिल्डींग, तळ मजला, कामतआळी, सतक्रार प्रेस समोर, ता.अलिबाग, जि. रायगड**
दुरध्वनी क्रमांक/फॅक्स क्र. ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

अर्जदार जयमहालक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. पनवेल ता.पनवेल ता.पनवेल जि.रायगड यांनी गैरअर्जदार १) मेसर्स विघ्नहर्ता एंटरप्रायजेस बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फ भागीदार श्री. प्रकाश वसंत जगनाडे श्री. नंदु आत्माराम वाजेकर २) श्री. रईस अब्दुल कादिर दळवी, ३) श्रीमती कमलाबाई हरदेवप्रसाद गुप्ता, ४) श्री. दिनेशचंद्र हरदेवप्रसाद गुप्ता, ५) श्रीमती संध्या हरदेवप्रसाद गुप्ता, ६) श्री. महेशचंद्र हरदेवप्रसाद गुप्ता, ७) मोमीनपाडा मस्जीद याकुब बेग ट्रस्ट, ता. पनवेल, जि. रायगड ७.१) श्री. अलहाज म. मुस्तफा याकुब बेग, चिफ ट्रस्टी, ७.२) श्री. अब्दुल गफार अ. सत्तार शेख, ट्रस्टी, ७.३) श्री. महम्मंद उमर सिद्दीकी, ट्रस्टी, ७.४) श्री. युसुफ खान अकबर खान, ट्रस्टी, ७.५) श्री. अल्लाबक्ष अप्पालाल मुल्ला, ता. पनवेल, जि. रायगड रायगड यांचेविरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**ता.पनवेल येथील अंतीम भूखंड क्र. टीपी स्कीम ०१-२५७ क्षेत्र १४२७.३० नगरभूमापन क्र. ८११ क्षेत्र १०७.९० चौ.मी.,नगर भूमापन क्र. ८१२ क्षेत्र १०९.५० चौ.मी., नगर भूमापन क्र.८१३ २०९.०० चौ.मी., नगरभूमापन क्र.७९३ क्षेत्र ५१.०० चौ.मी.**

अर्जदाराचे अर्जाबाबत गैरअर्जदार क्र. १ यांनी लेखी म्हणणे सादर केले. उर्वरीत गैरअर्जदार यांचे म्हणणे मांडण्यासाठी अर्जदाराने जाहीर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक १८/०७/२०२४ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक २७.०६.२०२४

**(प्रमोद जगताप)**
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड अलिबाग

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, मी माझ्या अशिलांच्या वतीने (१) श्री. महेंद्र रावजी छेडा, (२) श्री. केकीन कुंवरजी छेडा, (३) श्री. रसिक कुंवरजी छेडा आणि (४) रमेश रावजी छेडा, राहणार: २३४/३६, प्रेम भवन, नरशी नाथा मार्ग, मुंबई - ४००००९ ( ज्यांना एकत्रितरित्या **''मालक''** असे संबोधण्यात आले आहे) यांच्या मालकीची मौजे नावंढे, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथील विविध गट क्रमाकांची बिनशेती जमीन मिळकत जिचे एकत्रित अंदाजे क्षेत्र ९१.८८ एकर म्हणजेच ३,७१,८३५ चौरस मीटर्स, जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्ठात नमूद केलेले आहे (ज्यास यापुढे एकत्रितरीत्या **''सदर मिळकत''** असे संबोधण्यात आले आहे ) चे मालकी हक्क व अधिकार तपासत आहे. ज्यांनी माझ्या अशिलांना असे सादर केले आहे कि, ते सदर मिळकतीचे एकत्रितपणे मालक आहेत.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचेकडील MSRDC/SPA/BP-402/Layout Approval/2024/985 दिनांक ०६ जुन २०२४ आणि MSRDC/SPA/BP-404/Layout Approval/2024/881 दिनांक २७ मे २०२४ पत्रे आणि तहसिलदार, खालापूर यांचेकडील आदेश क्र. मशा/जमीनबाब/कात-१/६१६/छेडा/सनद/२०२४/२४८१ दिनांक १२ जून २०२४ आणि मशा/जमीनबाब/कात-१/६१६/छेडा/सनद/२०२४/२४११ दिनांक १३ जून २०२४ अनुसार, सदर मिळकत ११४९ रहिवास प्रयोजनार्थ भूखंड ज्यांचे क्रमांक ४२/अ/१ ते ४२/अ/६७, ४२/अ/१०४, ४२/अ/१०६ ते ४२/अ/२६०, ४२/ब/१ ते ४२/ब/४४४, ४२/क/१ ते ४२/क/३२३, ४२/ड/ओपन स्पेस ते ४२/ड/ ओपन स्पेस/११, ४२/बी एच/भूसंपादन रस्ता, ४२/ई/युटीलिटी/१ ते ४२/ई/युटीलिटी/४, ४२/ई/१ ते ४२/ई/६, ४२/ई/८, ४२/फ/१ ते ४२/फ/४३, ४२/फ/४५ ते ४२/फ/६८, ४२/प/अमीनिटी स्पेस/१ ते ४२/प/अमीनिटी स्पेस/७, १४५/ड/१ ते १४५/ड/२७, १४५/अ/ओपन स्पेस/१, १४५/अ/ओपन स्पेस/२, १४५/ब/अमीनिटी स्पेस/१, १४५/क/अंतर्गत रस्ता, १४५/ड/रोड वाइडनिंग एरिया, १४५/ई/१ ते १४५/ई/८, १४५/फ/१ ते १४५/फ/९ आणि १४५/ग/व्हिलेज रोड एरिया मध्ये पोट विभाजित झालेली आहे.

सर्व व्यक्ती/ संस्था, हिंदू अविभक्त कुटुंब, कंपनी, बँक, वित्तीय संस्था, ट्रस्ट, धर्मादाय संस्था, भागीदारी संस्था, मर्यादित दायित्व भागीदारी संस्था, वैयक्तिक व्यक्ति अथवा व्यक्तींची संस्था, संघटना, कर्जदार, प्राधिकरण, नोंदणीकृत अथवा अंनोंदणीकृत यांचा सदर मिळकतीबाबत किंवा त्यातील भागाबाबत कसलाही हक्क, अधिकार, हितसबंध, दावा, हरकत अथवा आक्षेप, कर्ज, बोजा अथवा गहाण, दान, भाडेकरार, लिज, सामंजस्य करार, साठेकरार, अदलाबादल करार, विकसन करार, कुलमुखत्यारपत्र, खरेदी, लेखी अथवा तोंडी वचनबद्धता पोटगी, मेहेर, मागणी, वहिवाट, ताबा, तडजोड, आदेश, हुकूम, लवाद निर्णय, विकास हक्क, भागीदारी हिस्सा, लिज-पेंडेंस, आरक्षण, एफ. एस. आय./टी. डी. आर./विकास क्षमता, नकाराचा पहिला अधिकार, मनाई अधिकार आणि/किंवा उत्तरदायित्व आणि/किंवा लेख आणि/किंवा कोणतीही सुविधा, करार, लेटर ऑफ इंटेट, अटीं आणि किंवा वचन कोणत्याही प्रकारे इत्यादि असल्यास खालील नमूद दिनांकाच्या **(चौदा) १४** दिवसांचे आत खालील नमूद पत्त्यावर व ई-मेल आयडी वर लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यासह कळवावे. अशाप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणीही काहीही न कळविल्यास असा कोणताही हक्क, अधिकार, हितसंबध, दावा, हरकत अथवा आक्षेप सोडून देण्यात आलेला आहे आणि/ किंवा त्याचा त्याग करण्यात आलेला आहे आणि आमचे आशिलांवर बंधनकारक नाही असे समजण्यात येईल. तसेच, सदर मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधंनातून, हक्कापासून आणि अधिकारापासून मुक्त असून सदर मिळकत निर्वेध व बोजेवीरहित आहे असे समजण्यात येईल.

**परिशिष्ठ**
**(सदर मिळकतीचे वर्णन)**

मौजे नावंढे, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथील खालील नमूद गट क्रमांकाची बिनशेती जमीन तदंगभूत वस्तूंसह:

| अनु क्र. | पूर्वीचे गट क्र. | जुने गट क्र. | क्षेत्र हे. आर. प्र. मध्ये | अनु क्र. | पूर्वीचे गट क्र. | जुने गट क्र. | क्षेत्र हे. आर. प्र. मध्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १७८ | ४२ | ०-३१-८० | ३० | २३१ | ९५ | ०-१९-३० |
| २ | १८० | ४४ | ०-०५-०० | ३१ | २३२ | ९६ | ०-८१-५० |
| ३ | १८१/१ | ४५/१ | ०-८०-०० | ३२ | २३६ | १०० | २-९२-९० |
| ४ | १८५/ब | ४९/ब | ०-२६-०० | ३३ | २३८ | १०२ | ०-३१-९० |
| ५ | १९५ | ५९ | ०-५१-३० | ३४ | २३९ | १०३ | ०-१७-७० |
| ६ | २०० | ६४ | ०-४२-५० | ३५ | २४० | १०४ | ०-०५-०० |
| ७ | २०१ | ६५ | १-१३-६० | ३६ | २४२ | १०६ | ०-०९-०० |
| ८ | २०३/१ | ६७/१ | १-७८-७० | ३७ | २४३ | १०७ | ०-१०-६० |
| ९ | २०३/२ | ६७/२ | ०-०६-६० | ३८ | २४४/१ | १०८/१ | ४-६६-९० |
| १० | २०४ | ६८ | ०-११-९० | ३९ | २४४/२ | १०८/२ | ०-२५-०० |
| ११ | २०५/१ | ६९/१ | ०-४४-४० | ४० | २४६ | ११० | २-०४-९० पैकी १-७०-७५ |
| १२ | २०७(पै.) | ७१/१ | ०-४७-०० | | | | |
| १३ | २०८ | ७२ | ०-९८-५० | ४१ | २४७ | १११ | ०-०४-५० |
| १४ | २१० | ७४ | ०-९०-०० | ४२ | २४८ | ११२ | ०-०६-०० |
| १५ | २११ | ७५ | ०-६६-७० | ४३ | २४९ | ११३ | ०-५०-९० |
| १६ | २१३ (पै.) | ७७ /२ | ०-४०-०० | ४४ | २५० | ११४ | ०-३०-९० |
| १७ | २१६ (पै.) | ८०/२ | १-५९-९० पैकी ०-४३-०० | ४५ | २५१ | ११५ | ०-०४-०० |
| | | | | ४६ | २५३ | ११७ | ०-८४-२० |
| १८ | २१७ (पै.) | ८१/२ | ०-६०-०० | ४७ | २५४ | ११८ | ०-४२-०० |
| १९ | २२६ | ९० | ०-२६-४० | ४८ | २५५ | ११९ | ०-०५-३० |
| २० | २२८ | ९२ | ०-९५-०० | ४९ | २५६ | १२० | ०-१४-९० |
| २१ | २२९ | ९३ | ०-००-९० | ५० | २५८ | १२२ | ०-२५-८० |
| २२ | २३० | ९४ | ०-०१-०० | ५१ | २५९ | १२३ | ०-०१-०० |
| २३ | २३३ | ९७ | ०-०४-०० | ५२ | २७२ | १३६ | १-७९-७० |
| २४ | २३४ | ९८ | ०-०१-०० | ५३ | २७३ | १३७ | १-१०-५० |
| २५ | २३५ | ९९ | १-१७-०० | ५४ | २७४ | १३८ | ०-०६-०० |
| २६ | २३७ | १०१ | ०-१६-०० | ५५ | २८०/१ | १४४/१ | १-९७-५० |
| २७ | २१९/१ | ८३/१ | ०-९८-१० | ५६ | २८१ | १४५ | ०-०६-३० |
| २८ | २२२ | ८६ | १-३०-०० | ५७ | २८७ | १५१ | ०-०२-०० |
| २९ | २२५ | ८९ | २-८९-९० | | | **एकूण** | **३७-१८-३५** |

दिनांक: ०१ जुलै, २०२४

तर्फे,
श्री. पवन आर. पाटील, वकील
शॉप क्र. ५, एस एम चंद्रभागा, प्लॉट क्र. १००, सेक्टर २१, उलवे,
तालुका पनवेल, जिल्हा रायगड, नवी मुंबई ४१०२०६.
ई-मेल: adv.patilpavan@gmail.com

# भारत जगज्जेता




। बार्बाडोस । वृत्तसंस्था ।

टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात अंतिम सामन्यात यापूर्वी जे झाले नाही ते भारताने करून दाखवले आते. टी-२० विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका संघात शनिवारी (दि.२९) बार्बाडोसला येथे झाला. या सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेवर ७ धावांनी विजय मिळवत दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषकावर नाव कोरत इतिहास रचला आहे.

भारताने २० षटकात ७ बाद १७६ धावा केल्या होत्या आणि दक्षिण आफ्रिकेसमोर १७७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेला २० षटकात ८ बाद १६९ धावाच करता आल्या. त्यामुळे भारताने ७ धावांनी ऐतीहासीक विजय मिळवला आहे.

यापूर्वी भारतीय संघाने एमएस धोनीच्या नेतृत्वात खेळताना २००७ साली पहिल्यांदा टी-२० विश्वचषक जिंकला होता. त्यानंतर तब्बल १७ वर्षांनी भारताने दुसऱ्यांदा या विजेतपदाला गवसणी घातली आहे. दरम्यान, टी-२० विश्वचषक दुसऱ्यांदा जिंकणारा भारत हा तिसरा संघ ठरला आहे. यापूर्वी असा कारनामा वेस्ट इंडीज आणि इंग्लंडने केला आहे. वेस्ट इंडीजने २०१२ आणि २०१६ साली तर इंग्लंडने २००९ आणि २०२२ मध्ये टी-२० विश्वचषकाला गवसणी घातली होती.

## आत्तापर्यंतचे विजेते

| | |
|---|---|
| २००७ | भारत |
| २००९ | पाकिस्तान |
| २०१० | इंग्लंड |
| २०१२ | वेस्ट इंडीज |
| २०१४ | श्रीलंका |
| २०१६ | वेस्ट इंडिज |
| २०२१ | ऑस्ट्रेलिया |
| २०२२ | इंग्लंड |
| २०२४ | भारत |

रोहित शर्मा एमएस धोनीनंतर टी-२० विश्वचषक जिंकणारा दुसरा भारतीय कर्णधार ठरला आहे. धोनीच्या नेतृत्वात २००७ साली भारताने पहिलाच टी-२० विश्वचषक जिंकला होता. तसेच, रोहित शर्मा भारतासाठी आयसीसी चषक जिंकणारा चौथा कर्णधार ठरला आहे. धोनी आणि रोहितपूर्वी भारताने कपिल देव आणि सौरव गांगुली यांच्या नेतृत्वात आयसीसीची विजेतीपदे जिंकलेली आहेत.

| | |
|---|---|
| १९८३ | कपिल देव (एकदिवसीय विश्वचषक) |
| २००२ | सौरव गांगुली (अजिंक्यपद चषक विभागून) |
| २००७ | एमएस धोनी (टी-२० विश्वचषक) |
| २०११ | एमएस धोनी (एकदिवसीय विश्वचषक) |
| २०१३ | एमएस धोनी (अजिंक्यपद चषक ) |
| २०२४ | रोहित शर्मा (टी-२० विश्वचषक) |



## भारताच्या भिंतीने बदला घेतलाच

गेल्या ११ वर्षांपासून १३० कोटींहून अधिक लोक या चषकाची वाट पाहत होते. इतर सर्वांसाठी ही प्रतीक्षा गेल्या ११ वर्षांपासून असली तरी भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडसाठी ही प्रतीक्षा १७ वर्षांची आहे. २१ वर्षांपूर्वी म्हणजे २००३ मध्ये द्रविड संघांचा उपकर्णधार असताना ऑस्ट्रेलियाने भारतीय संघाला विजेतपद जिंकण्यापासून रोखले होते. यानंतर २००७ च्या एक दिवसीय विश्वचषकात राहुल द्रविड भारतीय संघाचा कर्णधार होता. आणि तेव्हा ही स्पर्धा वेस्ट इंडिजमध्ये आयोजित करण्यात आली होती. यावेळी भारतीय संघाला साकळी सामन्यांतच लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले होते. त्यानंतर द्रविडने भारतीय संघाचे कर्णधारपद सोडले आणि २००७ मध्ये होणाऱ्या पहिल्या टी-२० विश्वचषकात सहभागी होण्यास नकार दिला. २०११ मध्ये विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा तो भागही नव्हता. इतकं गमावल्यानंतर राहुल द्रविडच्या नशिबाने त्याला पुन्हा एकदा भारतीय संघासोबत वेस्ट इंडिजला आणले. केन्सिंग्टन ओव्हलवरची २९ जूनची तारीख रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यासाठी जितकी खास होती तितकीच राहुल द्रविडसाठी खास होती.



## विराटची बॅट तळपली

टी-२० विश्वचषकात ७ सामन्यात ७५ धावा करणाऱ्या विराट कोहलीची अखेर अंतिम सामन्यात बॅट तळपली. भारताची अवस्था ३ बाद ३४ धावा अशी झाली असताना डाव सावरत अर्धशतकी खेळी केली. त्याने हे अर्धशतक ठोकण्यासाठी ४८ चेंडू घेतल्या. त्याचे हे टी-२० विश्वचषकातील सहा बाद फेरी सामन्यातील पाचवे अर्धशतक आहे. ज्यावेळी भारताला गरज होती त्यावेळी किंग कोहलीकडून मोठी खेळी झाली. अक्षर पटेल आल्यानंतर विराटची खेळी थोडी संथ झाली होती. परंतु, अर्धशतक केल्यानंतर विराट कोहलीने गिअर बदलला. त्याच्या ५९ चेंडूत केलेल्या ७६ धावांमुळे भारताने १७६ धावांपर्यंत मजल मारली.





## द्रविडचे सेलीब्रेशन

टी-२० विश्वविजयाचा चषक द्रविडच्या हातात सोपवला तेव्हा त्याने अगदी लहान मुलासारखे जोरदार ओरडत सेलीब्रेशन केले. त्याचे असे सेलीब्रेशन करतानाचे फोटो आणि व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहेत. विशेष म्हणजे द्रविड नेहमीच शांत खेळाडू म्हणून समजला जातो. तो बऱ्याचदा त्याच्या भावना व्यक्त करत नाही. मात्र, भारताने अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर त्याने त्याच्या भावना व्यक्त केल्या.

## सूर्यकुमारचा आश्चर्यकारक झेल

या सामन्यात संपूर्ण भारतीय संघाने चमकदार कामगिरी केली असली तरी या विजयात मोठा वाटा सूर्यकुमार यादवचा होता. या सामन्यात सूर्याची बॅट फार काही चालली नाही. तो फक्त ३ धावा करून बाद झाला. मात्र, त्याने सामन्याचे चित्र पालटणारे काम केले. सुर्याने २०व्या षटकात हार्दिक पांड्याच्या चेंडूवर सीमारेषेवर घेतलेला डेव्हिड मिलरचा आश्चर्यकारक झेल सामन्याचा टर्निंग पॉइंट ठरला. तो जवळपास षटकारच होता. मात्र, सूर्याने बाऊंड्री लाईनचा चेंडू आता ओढून घेत अशक्य झेल शक्य केला.



## जसप्रीतची डेथ बॉलिंग

जसप्रीत बुमराहने १८ व्या षटकात मार्को येनसेनचा बळी घेतला. त्यानंतर टिच्चून मारा करत सामना बॉल टू रन आणला. बुमराहने १८व्या षटकात फक्त २ धावा देत १ बळी घेतला. भारताने सामन्यावर खरी पकड तिथेच मिळवली होती.

## अक्षर पटेलची महत्वाची खेळी

भारताच्या बॅटिंगमध्ये विराट कोहलीच्या ७६ धावांची येणाऱ्या भविष्यात खूप चर्चा होणार आहे. मात्र, याचबरोबर अक्षर पटेलने केलेल्या ४७ धावांची केलेली खेळी फार महत्वाची होती. याच खेळीमुळे या दोघांनी चौथ्या विकेटसाठी ७३ धावांची अत्यंत महत्वाची भागीदारी रचली.



● भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील अंतिम सामन्याचे प्रक्षेपण पाहण्यासाठी अलिबाग मधील गुरूप्रसाद हॉटेलमध्ये मोठी स्क्रीन लावण्यात आली होती.

## टी-२०ला अलविदा

हा सामना भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीसाठी वैयक्तिक रित्याही भावूक ठरला. अंतिम सामन्यात सवोत्तम खेळी करत तो या सामन्याचा सामनावीरही ठरला. पण सामनावीर पुरस्कार जिंकल्यानंतर विराट अत्यंत भावूक झाला होता. त्याने यावेळी सांगितले की, हा माझा शेवटचा टी-२० विश्वचषक आहे. आम्हाला हे चषक उंचवायचे होते. असे नाही की आम्ही जर हरलो असतो, तर मी हे घोषित केले नसते. हे आधिच ठरलेले होते. असे म्हणत विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहिर केली. विराट कोहलीपाठोपाठ रोहित शर्मानेही आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. सामन्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत रोहित शर्मानि तो आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्त होत असल्याचे सांगितले. याचबरोबर रविंद्र जडेजानेही आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटला अलविदा करत निवृत्ती जाहीर केली आहे.

## आयपीएलचा झिरो ठरला हिरो

भारताच्या विजयाचा खरा हिरो ठरला तो हार्दिक पांड्या! हार्दिक पांड्याने शेवटच्या ५ षटकात चांगला मारा केला. त्याने १७ व्या षटकात ४ धावा देत क्लासेनचा बळी घेतला. क्लासेनने २७ चेंडूत ५२ धावांची खेळी केली होती. तो मैदानावर होता तोपर्यंत सामना दक्षिण आफ्रिकेच्या बाजेने होता. मात्र, हार्दिकने पराभवाच्या दाढेतून विजय खेचून आणला.





## अर्शदीपचे १९वे षटक

सामना ज्यावेळी बॉल टू रन आला होता त्यावेळी १९वे षटक जे सर्वात महत्वाचे षटक होते ते कोण टाकणार, असा प्रश्न होता. हार्दिक अनुभवी होता तर अर्शदीपने यापूर्वी शेवटचे षटक टाकले होते. मात्र, रोहितने अर्शदीपला १९वे षटक दिले. त्याने आफ्रिकेला विजयासाठी १२ चेंडूत २० धावांची गरज असताना फक्त ४ धावा देत हार्दिकसाठी १६ धावा राखून ठेवल्या.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)